लोकशाही वार्ता
चंद्रपूर
गुड मॉर्निंग
नागपूर, शुक्रवार, ४ जुलै २०२५/९

### वाहनाची दुचाकीला धडक, एक जण ठार

**वर्धा :** भरधाव वेगातील वाहनाने दुचाकीला धडक दिली. त्यात एक जण ठार तर एक जण जखमी झाला. ही घटना ३० जून रोजी धोत्रा चौरस्ता शिवारात घडली. वैभव शंकरराव महाजन (२७) रा. एकुर्ली असे आहे. तर या अपघातात शंकर भगवान महाजन (४५) रा. एकुर्ली हे जखमी झाले. वैभव महाजन आणि शंकर महाजन हे एमएच ३२ ऐवी ९६९२ क्रमांकाच्या दुचाकीने जात होते. दरम्यान, एमएच १६ सीसी ७५७५ क्रमांकाच्या ट्रकने धोत्रा चौरस्ता शिवारात दुचाकीला धडक दिली. त्यात वैभव महाजन याचा मृत्यू झाला तर शंकर महाजन जखमी झाले. याप्रकरणी अल्लीपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### उद्या राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य चंद्रपूरमध्ये

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य वड्डेपल्ली रामचंदर हे ५ जुलै रोजी चंद्रपूर येथे येत आहेत. त्यांचे शनिवारी (दि. ५ जुलै) दुपारी २.३० वाजता चंद्रपूर येथे आगमन होईल. त्यानंतर ते शहरातील रयतवारी कॉलरी येथे नागरिकांच्या अडीअडचणी समजून घेऊन ते सामाजिक संघटनांसोबत चर्चा व सायंकाळी सहा वाजता चंद्रपूरवरून प्रस्थान करतील.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

# भद्रावती नगरपालिकेच्या तिजोरीत ठणठणाट

## जबाबदार घटकांवर कारवाईची करा : विधिमंडळात आ. देवतळे यांची मागणी



**लोकशाही वार्ता/भद्रावती**

गेल्या अनेक वर्षापासून भाजी मंडई व बाजारपेठेसाठी भाडेतत्त्वावर घेतलेल्या खासगी जागेचे रु ४९.२५ लाख भाडे थकविल्यामुळे न्यायालयाने नगरपालिकेच्या साहित्याचे जप्तीचे आदेश दिले आणि ३० जून रोजी कार्यालयावर प्रत्यक्षात जप्तीची कारवाईही झाली. त्यामुळे भद्रावती नगरपालिकेच्या तिजोरीतील ठणठणाट असून, जबाबदार घटकांवर कारवाई करावी, अशी मागणी आमदार करण देवतळे यांनी विधानसभेत मांडली.

सभागृहात आमदार देवतळे म्हणाले की, जप्तीची कारवाई नगरपरिषदेच्या अनियोजित कारभारावर मोठा ठपका आहे. सामान्य नागरिकांनी थोडा उशीर केला तरी त्यांच्यावर कारवाई होते, पण इथे संपूर्ण नगरपालिका कार्यालयावर जप्ती लावली गेली, ही बाब अत्यंत संतापजनक आहे. पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांनी नगरपरिषदेच्या माध्यमातून जनतेच्या पैशाची लूट केली, याची सर्वसमावेशक चौकशी होणे गरजेचे आहे.

सोबतच भद्रावती नगर परिषदेकडे हक्काची जागा नसल्यामुळे शहर हद्दीतील शासकीय जागा नगरपरिषदेला अतिरिक्तरित्या ताब्यात देण्यात यावी, अशी विनंतीही आमदार करण देवतळे यांनी पावसाळी अधिवेशनात शासनाकडे केली आहे. या संपूर्ण विषयावर शासनाने तातडीने आढावा बैठक घेऊन योग्य उपाययोजना कराव्यात, जबाबदार घटकांवर कारवाई करावी, अशी स्पष्ट मागणी आमदार देवतळे यांनी सभागृहात गुरुवारी केली.

### न. प. कार्यालयातील साहित्यांची जप्ती

आठवडी बाजारासाठी शहरातील राजू गुंडावार, संजय गुंडावार व किशोर गुंडावार यांची ३० हजार ३३ फुट जमीन २०१८ मध्ये भद्रावती नगरपरिषदने ६६ हजार रुपये प्रतीमहिना भाडेतत्त्वावर घेतली होती. प्रारंभी काही महिने भाडे चुकते करण्यात आल्यानंतर नगरपरिषदेकडून पुढील भाडे थकीत करण्यात आले. थकीत भाड्याची जवळपास ६६ लाख एवढी रक्कम थकीत झाली. या रकमेची गुंडावार यांनी नगरपरिषद कार्यालयाकडे अनेकदा मागणी केली व त्यासाठी पुरेशी संधीही दिली. मात्र, नगरपरिषदेतर्फे सदर रक्कम चुकती करण्यात न आल्याने गुंडावार यांनी याविरोधात वरोरा येथील दिवानी न्यायालयात खटला दाखल केला. या खटल्याचा निकाल न्यायालयाने गुंडावार यांच्या बाजूने देत रक्कम वसुलीसाठी जप्तीचे अधिकार गुंडावर यांना दिले.

# गँगमनच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली

## राप्तीसागर एक्सप्रेस थोडक्यात बचावली



**लोकशाही वार्ता/भद्रावती**

त्रिवेंद्रमहून गोरखपूरकडे जाणारी राप्तीसागर एक्सप्रेस (गाडी क्रमांक १२५१२) एका भीषण अपघाताच्या उंबरठ्यावर असतानाच, माजरी जंक्शनजवळ गँगमनच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली. ही घटना दुपारी १.५१ वाजताच्या सुमारास घडली.

माजरी जंक्शनजवळील रेल्वे पोल क्रमांक ८४१ बी/२१ ए ते ८४१ बी/१९ दरम्यान रेल्वे पटरीचा एक भाग तुटलेला आढळून आला. गस्तीदरम्यान गँगमनला हे लक्षात आले. प्रसंगावधान राखत त्याने तात्काळ रेड फ्लॅग लावून येणाऱ्या राप्तीसागर एक्सप्रेसला थांबवले. त्याच्या वेळीच दिलेल्या इशाऱ्यामुळे ट्रेन थांबवण्यात यश आले आणि सुमारे शेकडो प्रवाशांचे प्राण वाचले.

दरम्यान रेल्वे प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन तुटलेल्या पटरीची दुरुस्ती केली. आवश्यक सर्व तपासण्या करून राप्तीसागर एक्सप्रेसला सुरक्षितपणे पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आले. गँगमनच्या सावधपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

त्यांच्या सतर्कतेमुळे शेकडो प्रवाशांचे प्राण वाचले. मात्र वेळेवर गस्ती होत नसती किंवा गँगमनने इंजिन ड्रायव्हरला तत्काळ इशारा दिला नसता, तर प्रचंड जीवितहानी झाली असती. या प्रकारामुळे रेल्वेच्या देखभाल व्यवस्थेतील त्रुटी व दुर्लक्ष स्पष्टपणे समोर आले आहे. दररोज हजारो प्रवासी रेल्वेवर अवलंबून असताना, अशा प्रकारच्या सुरक्षा त्रुटी गंभीर चिंता निर्माण करणाऱ्या आहेत. संबंधित विभागांकडून नियमित तपासणी व तांत्रिक देखभाल याकडे अधिक गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे, अशी मागणी प्रवासी व नागरिकांतून होऊ लागली आहे.

# विकासकामात गती निर्माण करा - पुलकित सिंह

## सिदेंवाही तालुक्यातील विकासकामाची पाहणी



**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी नुकताच सिदेंवाही तालुक्याचा दौरा केला असून, सिदेंवाही तालुक्यातील विविध विकास कामांना भेटी देऊन, पाहणी केली आहे. या भेटी दरम्यान गावातील विकास कामे गतीने निर्माण करा. कामात गती आणा असे सूचना यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकीत सिंह यांनी केल्या.

सर्वप्रथम सिदेंवाही पंचायत समितीमध्ये सर्व विभागाचा आढावा घेण्यात आला यामध्ये कामात पारदर्शकता ठेवून कामे करा. सर्व विकासकामे वेळेत पूर्ण करा,अशा सूचनाही पुलकित सिंह यांनी दिली आहे. यावेळी पुलकीत सिंह यांनी सिदेंवाही तालुक्यातील काही गावातील विकास कामांची पाहणी केली. यावेळी पेडगाव या गावात भेट देऊन गावातील शाळा व अंगणवाडी, मोहाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, जामसाळा ग्रामपंचायतला भेट देऊन ग्रामपंचायतच्या कामकाजाची विचारणा केली. नवरगाव येथील नव्याने तयार झालेले घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पची पाहणी करून, गावातील कचऱ्याचे वर्गीकरण करून, सर्व प्रकारचा कचरा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात रोज आणावा, गावातील कचरा रोज गोळा करावा, अशा सूचना केल्या. यासोबतच मामा तलाव दुरुस्तीच्या कामाची पाहणी करून यंत्रणेला योग्य ते निर्देश दिले. यावेळी पंचायत समिती सिदेंवाहीचे गटविकास अधिकारी आत्मज मोरे तथा विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# मुख्याधिकाऱ्यांच्या विरोधात मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

## अतिक्रमण नोटीसमध्ये तक्रारदाराचे नाव उघड केल्याने वाद

**लोकशाही वार्ता/कोरपना**

कोरपना येथील एका नागरिकाने नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी यांच्याविरोधात थेट मुख्यमंत्र्यांना तक्रार केली आहे. अतिक्रमण हटवण्यासाठी दिलेल्या नोटीसमध्ये मुख्याधिकारी यांनी तक्रारदाराचे नाव उघड केल्यामुळे वैयक्तिक विरोध वाढवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मोहब्बत खान यांनी कोरपना येथील मुख्य बस स्टॉप चौकातून शहराकडे जाणारा मुख्य मार्गावर झालेल्या अतिक्रमण संदर्भात नगरपंचायतीकडे अतिक्रमण हटवण्याची तक्रार केली होती. या तक्रारीनंतर, मुख्याधिकारी येमाजी धुमाळ यांनी अतिक्रमणधारकांना नोटीस बजावली. मात्र, या नोटीसमध्ये तक्रारदाराचे नाव स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते, ज्यामुळे तक्रारदार संतप्त झाले आहेत.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, प्रशासकीय नियमांनुसार सार्वजनिक हितासाठी केलेल्या तक्रारींमध्ये तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवणे बंधनकारक असते. असे असताना, मुख्याधिकारी यांनी त्यांचे नाव उघड करून गोपनीयतेचा भंग केला आहे. यामुळे अतिक्रमणधारकांकडून त्यांना वैयक्तिक त्रास किंवा संभाव्य धोक्याची शक्यता निर्माण झाली आहे. या कृतीमुळे मुख्याधिकारी यांनी आपल्या पदाचा गैरवापर केला असून, अतिक्रमणधारकांशी माझा वैयक्तिक संघर्ष वाढवण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे.

या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर, तक्रारदाराने जिल्हाधिकाऱ्यांकडे मुख्याधिकारी यांच्यावर तत्काळ सखोल चौकशी करून योग्य ती प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या प्रकरणामुळे नगरपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, मुख्यमंत्री यांच्याकडून यावर काय कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या घटनेमुळे भविष्यात नागरिकांना सार्वजनिक हितासाठी तक्रार करण्यास प्रोत्साहन मिळेल की नाही, याबाबतही शंका उपस्थित केली जात आहे.

## भाजपा तालुकाध्यक्षपदी किशोर वाकुडकर यांची निवड

**लोकशाही वार्ता/सावली**

भारतीय जनता पार्टीच्या नुकत्याच मुंबई येथे झालेल्या बैठकीत,पक्षाच्या चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण अंतर्गत कार्यरत मंडळासाठी, नवीन मंडळ अध्यक्षांची निवड करण्यात आली. भाजपाचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा यांनी नवीन मंडळ अध्यक्षांची यादी जाहीर केली. यात सावली तालुका भाजपा अध्यक्षपदी युवा कार्यकर्ते किशोर वाकुडकर यांची



निवड करण्यात आली.

## निर्माणाधीन पुलाचे काम ठरत आहे नागरिकांसाठी डोकेदुखी

**लोकशाही वार्ता/घुग्घुस**

घुग्घुस-वणी-म्हातारदेवी मार्गावर सुरू असलेल्या पुलाच्या बांधकामामुळे परिसरातील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या भागात लहान-मोठ्या वाहनचालकांकडून झुकेगा नहीं या शैलीत होत असलेली मुजोरी आणि मनमानी यामुळे रोजच मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होते आहे. यामध्ये वाहतूक नियमांची सर्रास पायमल्ली होत असून सामान्य नागरिकांना तासन ?तास वाहतूक कोंडीमध्ये अडकून बसावे लागत आहे. या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका शालेय विद्यार्थी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक, आजारी रुग्ण आणि आपत्कालीन सेवा यांना बसत आहे. वेळेवर आपल्या ठिकाणी पोहोचता न आल्यामुळे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक त्रास भोगावा लागत आहे. या परिस्थितीबाबत स्थानिक नागरिकांनी प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## उद्योगविषयक बाबींचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा



**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

जिल्ह्यात उद्योगांना चालना देणे, स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देणे, त्यांच्या अडीअडचणी समजून घेणे तसेच एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत निर्यात धोरण निश्चित करणे आदी बाबी संदर्भात जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाचा आढावा घेण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, उद्योगांमध्ये ८० टक्के स्थानिकांना रोजगार देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. जिल्ह्यात सर्व उद्योगांनी या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी. याबाबत कोणतीही तक्रार येऊ देऊ नका. कंत्राटदारांकडून भरती प्रक्रिया होत असल्यास संबंधित कंत्राटदारानेसुध्दा या नियमाचे तंतोतंत पालन करावे. स्थानिक लोकांना रोजगार पुरविण्यासंदर्भातील वार्षिक अहवाल महाव्यवस्थापक यांच्याकडे सादर करावा. उद्योगांना मनुष्यबळ पुरविण्यासाठी विविध प्रकारचे कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहेत. ज्या उद्योगांना अशा प्रकारच्या मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास त्यांनी जिल्हा उद्योग केंद्राशी संपर्क करावा. सन २०२४-२५ मध्ये कंपन्यांनी खर्च केलेल्या सामाजिक दायित्व निधीबाबत (सी.एस.आर.) सर्व कंपन्यांचा आढावा, तसेच सन २०२५-२६ च्या खर्च नियोजनाबाबतचा अहवाल त्वरीत सादर करावा, अशा सुचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीला जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक ऋतुराज सुर्या, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष मधुसूदन रुंगठा यांच्यासह विविध उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### एक जिल्हा एक उत्पादन

चंद्रपूर जिल्ह्यातील मागील वर्षी २० टक्क्यांनी वाढलेली निर्यात व यावर्षी निर्यात वाढीकरीता उपाययोजना करणे, तसेच एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत जिल्ह्यातील तांदूळ आणि बांबू प्राधान्याने निर्यात व्हावे, याबाबत आढावा घेण्यात आला. चंद्रपूरमध्ये टेस्टिंग लॅब, मुल येथे लॉजिस्टिक हब तसेच बँक ऑफ इंडिया, चंद्रपूर येथे परकीय चलन कक्ष प्रस्तावित असून चंद्रपूर जिल्ह्यातील निर्यात वाढीकरीता खुप फायदेशीर ठरणार असल्याचे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक ऋतुराज सुर्या यांनी सांगितले.

## प्रधानमंत्री धरती आबा जनभागीदारी अभियान कार्यक्रम

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

आदिवासी भागांमध्ये सेवा आणि पायाभूत सुविधांची परिपूर्णता सुनिश्चित करणे, हा प्रधानमंत्री धरती आबा जनभागीदारी अभियानचा प्रमुख उद्देश आहे. या अभियानामध्ये शासनाच्या १७ विभागांच्या २५ सेवांचा समावेश करण्यात आला असून ५ जुलै २०२५ रोजी पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत प्रत्यक्ष ग्रामस्तरावर शिबिरांच्या माध्यमातून आधारकार्ड, रेशनकार्ड, आयुष्मान भारतकार्ड, जातीचे प्रमाणपत्र, पीएम-किसान, जनधनखाते, काढणे अशा सेवा देण्यात येणार आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात या शिबिरांचे आयोजन दिनांक १५ ते ३० जून दरम्यान करण्यात आले होते. त्या अनुषंगाने ५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सभागृह, चंद्रपूर येथे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक ऊईके, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे. या कार्याक्रमास जिल्ह्यातील खासदार, आमदार तसेच जिल्हाधिकारी व सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. जिल्हास्तरीय कार्यक्रमास सर्व आदिवासी सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते व आदिवासी बंधु-भगिनींनी सहभागी होण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी केले आहे.

# व्यावसायिक मार्गदर्शन कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**लोकशाही वार्ता/गडचांदूर**


शालेय जीवन संपल्यानंतर विद्यार्थ्यांसमोर १२वी नंतर काय? हा महत्त्वाचा प्रश्न उभा ठाकतो. याच प्रश्नाचे योग्य उत्तर शोधण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरची योग्य दिशा मिळावी यासाठी बुधवार, २ जुलै २०२५ रोजी महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय गडचांदूर येथे जीवन कौशल्य व व्यावसायिक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम अल्ट्राटेक माणिकगड सिमेंट कंपनी, राष्ट्रीय सेवा योजना व कॅलिबर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रफुल्ल माहुरे उपस्थित होते. तर मार्गदर्शन करण्यासाठी हेमांगी विश्वास, अंकिता कुचनकर, पौर्णिमा बारापात्रे व प्रणय येरोजवार उपस्थित होते. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रदीप परसूटकर, कॅलिबर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. आशिष देरकर व कनिष्ठ महाविद्यालयाचे इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्संचालन सोनाली वाटेकर यांनी केले तर आभार प्रा. आशिष देरकर यांनी मानले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विविध कौशल्य विकास, करिअर पर्याय व व्यावसायिक अभ्यासक्रमांची माहिती देऊन त्यांच्या मनातील संभ्रम दूर करण्यात आले. अल्ट्राटेक कंपनीच्या सीएसआर उपक्रमातून राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या भविष्य घडविण्यास नक्कीच उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# प्रत्येकच नागरिक हा विना वर्दीतील पोलिस

## सहकार्याने सण उत्सव शांततेत पार पाडू या - अपर जिल्हाधिकारी



**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

आगामी दोन-तीन दिवसांत जिल्ह्यात आषाढी एकादशी आणि मोहरम तसेच पुढील महिन्यांपासून गणेशोत्सव व इतर सणांना सुरवात होणार आहे. या दरम्यान जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच सर्वधर्मीय सण शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाला आपल्या सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. कारण, प्रत्येकच नागरिक हा विना वर्दीतील पोलिस आहे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे यांनी केले. नियोजन भवन येथे जिल्हास्तरीय शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी अपर जिल्हाधिकारी व्यवहारे म्हणाले की, सर्वांनी आपापल्या कर्तव्याची जाणीव ठेवावी. सोशल मिडीयावर येणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये. मोहरम आणि एकादशी एकत्रित येत असून ग्रामीण स्तरावर जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधितांना योग्य निर्देश द्यावेत. मोकाट जनावरे, रस्त्यावरील खड्डे याबाबत स्थानिक स्वराज्य संस्था, सा. बा. विभागाने विशेष देणे गरजेचे आहे. सण उत्सवाच्या कालावधीत वीज पुरवठा अखंडीत सुरू राहील, याची महाविरतण कंपनीने काळजी घ्यावी. या कालावधीत मद्यविक्रीचा साठा अचानक वाढणार नाही, यासाठी उत्पादन शुल्क विभागाने तपासणी करावी. प्रादेशिक परिवहन अधिकारी व पोलिस विभागाने वाहतूक व्यवस्थेचे योग्य नियोजन करावे. तसेच आरोग्य विभागाने फिरते वैद्यकीय पथक, पुरेसा औषधीसाठी ठेवावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

### अफवांबाबत सर्वांनी अलर्ट राहावे - अतिरिक्त पोलिस अधीक्षक कातकाडे

सोशल मिडीयाबाबत सर्वांनी दक्ष राहणे गरजेचे असून कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. कृत्रिम बुध्दिमत्तेच्या माध्यमातून आजकाल बनावट पोस्ट करणे शक्य असून, असे आढळल्यास त्वरीत सायबर पोलिस स्टेशनसोबत संपर्क करावा. शांतता राखणे ही प्रत्येकाचीच जबाबदारी आहे. सण आणि उत्सवादरम्यान पुरेसा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येईल. ध्वनी प्रदूषणाबाबत डीजे ऑपरेटर्सची बैठक घेऊन मर्यादेचे पालन करण्याचे त्यांना सांगितले जाईल. उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल. चंद्रपूर जिल्ह्यातील आगामी सण उत्सव शांततेत पार पडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी मनपा आयुक्त विपीन पालीवाल यांनीसुध्दा मनोगत व्यक्त केले. यावेळी अतिरिक्त पोलिस अधिक्षक ईश्वर कातकाडे, सहायक पोलिस अधिक्षक नियोमी साटम, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपमुख?य कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मंगला घागी यांनी केले. बैठकीला उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय पोलिस अधिकारी, मुख्याधिकारी, पोलिस पाटील आदी उपस्थित होते.

## विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

**लाखांदूर:** लाखांदूर तालुक्यातील राजनी गावात विजेच्या धक्क्याने युवकाचा मृत्यू झाला. युवराज जाधव थेरे रा. राजनी असे या तरुणाचा नाव आहे. युवराज जाधव थेरे यांचे राजनी येथे नवीन घर बांधण्यात आले होते. ते दररोज रात्री त्या नव्या घरी झोपण्यासाठी जात होते. २ रोजी जुलै रोजी ते नव्या घरात गेले होते. घराजवळील विद्युत खांबावर त्यांनी काही कारणास्तव वायर टाकली असता त्यांना जोरदार विजेचा धक्का बसला. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. ३ जुलै रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. पुढील तपास लाखांदूर पोलिस करीत आहेत.




## ट्रकमधून १८० लिटर डिझेलची चोरी

**तुमसर :** तुमसर पोलिस ठाणे हद्दीत येणाऱ्या चिचोली परिसरात दोन ट्रकमधून १८० लिटर डिझेल चोरीला गेल्याची घटना गुरुवारी, (दि.३) उघडकीस आली. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादी खेमराज धनलाल राऊत (३८, रा. भुसारी टोला, ता. सडक अर्जुनी) हे ट्रकचालक असून, त्यांनी चिचोली गावाजवळील रस्त्यावर आपला ट्रक (क्र. एमएच-३५/ एए-३७५० ) व दुसरा ट्रक (क्र. एमएच-४०/एवाय-५३५८ ) जवळपास उभे करून विश्रांती घेत होते. दरम्यान, ट्रक पंचर झाल्याने व रस्त्याच्या बाजूला थांबविल्याचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने दोन्ही ट्रकच्या डिझेल टाक्यांमधून १६२०० रुपयाचे १८० लिटर डिझेल चोरी करून नेले.


epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta


## दृष्टिक्षेप

### रेल्वेतून पडून प्रवाशाचा मृत्यू

**भंडारा:** भोपाळहून गोंदियाकडे रेल्वेने प्रवास करत असलेल्या प्रवाशाचा रेल्वेतून पडून मृत्यू झाला. याप्रकरणी वरठी पोलिस ठाण्यात मर्ग नोंदविण्यात आला आहे. मृतकाचे नाव पदमसिंग राजाराम राठोड (५५) रा. तिनोनिया, ता. अहमदपूर, मध्यप्रदेश असे आहे. मृतक हे पत्नी व इतर नातेवाईकांसह भोपाळहून गोंदियाकडे रेल्वेने प्रवास करत होते. प्रवासादरम्यान नेरी रेल्वे गेटजवळ पदमसिंग राठोड रेल्वेतून खाली पडले आणि त्यांच्या अंगावरून रेल्वे गेल्याने जागीच मृत्यू झाला.

### दुचाकी चोरली

**भंडारा :** अज्ञात चोराने दुचाकी चोरून नेल्याची घटना सालेभाटा ता. लाखनी २ जुलै रोजी उघडकीस आली. याप्रकरणी लाखनी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी लहानदास टेंभुर्णे (२३, रा. सालेभाटा) हे त्यांच्या सायकल स्टोअरमध्ये हजर असताना, सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास एक अनोळखी इसम त्यांच्या दुकानात मोटारसायकल क्र. क्र. एमएच- ३६/ बी- २३३७ ने आला. त्याने कल्च वायर खराब झाली असल्याचे सांगून फिर्यादीकडील मोपेड क्र. एमएच- ३६/ एएन- ६९८९ घेऊन गेला. मात्र, तो परत आला नाही.

### वृद्धेची आत्महत्या

**तुमसर :** तुमसर तालुक्यातील आसलपानी गावात राहणाऱ्या एका वयोवृद्ध महिलेने मानसिक अस्वस्थतेमुळे विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना २ जुलै रोजी उघडकीस आली आहे. या प्रकरणी गोबरवाही पोलिस ठाण्यात मर्ग नोंदविण्यात आला आहे. पुस्तकला हरीराम उईके (६७, रा. आसलपानी) असे मृतकचे आहे. मृतक पुस्तकला काही काळापासून मानसिक आजाराने त्रस्त होत्या आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते. दि. १ जुलै रोजी पहाटे ४ वाजता त्या कोणालाही काही न सांगता घरातून निघून गेल्या होत्या. दि. २ जुलै रोजी गावातील ग्रामपंचायतीच्या विहिरीत त्यांचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला.



# गोसेखुर्दची ९ वक्रद्वारे उघडली

### धरणातून ११५८ क्युमेक्स पाण्याचा विसर्ग

**लोकशाही वार्ता/भंडारा**

जिल्ह्यात सध्या पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळे नदीनाल्यांच्या पाण्याच्या पातळीत वाढ होत आहे. वैनगंगा नदीमध्ये पाण्याची पातळी नियंत्रित करण्यासाठी गोसेखुर्द धरणाचे ९ दरवाजे आज ३ जुलै रोजी उघडण्यात आले. या धरणातून ११५८ क्युमेक्स पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

वैनगंगा नदीत पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याने पुरस्थिती निर्माण होत असते. त्यामुळे या पाण्याचा विसर्ग सातत्याने करणे आवश्यक असते.

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळे नदीची पाणीपातळी झपाट्याने वाढत आहे. ही पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी गोसेखुर्द धरणामधून पाण्याचा विसर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला.

३ जुलै रोजी दुपारी २च्या सुमारास गोसेखुर्द धरणाचे ९ वक्रद्वारे उघडून त्यातून ११५८ क्युमेक्स पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला.

दोन्ही जलविद्युत प्रकल्पांचा २०८ क्युमेक्स विसर्ग पकडून एकूण अंदाजे ११५८ क्युमेक्स पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. त्यामुळे नदीपात्रातून आवागमन करणाऱ्यांनी सतर्क राहावे, अशा सूचना आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

## ग्रामीण भागात शेळ्या चोरटे सक्रिय

### अंगणातून, शेतातून शेळ्या करतात लंपास

**लोकशाही वार्ता/मोहाडी**

आजपर्यंत घरफोडी, दागिने, दुचाकी अशा चोरीच्या बातम्या ऐकायला येत होत्या. परंतु आता चक्क शेळ्या चोरी जातांनाच्या बातम्या वाहू लागल्याने ग्रामीण भागात खळबळ निर्माण झाली आहे.

ग्रामीण भागात अगोदरच रोजगाराची कमतरता असल्याने ग्रामीण भागातील नागरिक जोडधंदा म्हणून घरी शेळीपालन, गाई-म्हशीपालन असा व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह चालवण्याचा प्रयत्न करीत असतात. पण आता ग्रामीण भागात सध्या शेळ्या चोरण्याचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. कितीतरी गावात शेळ्या चोरीला गेल्या आहेत. मात्र अजून पर्यंत चोरी गेलेल्या शेळ्या पोलिसां कडून पकडण्यात अद्यापही यश न आल्याने शेळ्या चोरट्यांच्या प्रमाणात भर पडत आहे.याच आठवड्यात मोहाडी तालुक्यातील आंधळगाव येथील रहिवाशी ईश्वर बुराडे यांच्या २० हजार रुपये किमतीच्या ५ शेळ्या शेतावरून अज्ञात चोरट्यानी चोरून नेल्या. शेळ्या मालकांनी या संबंधीची तक्रार आंधळगाव पोलिसात दिली आहे. यापूर्वीही तालुक्यात अनेक गावातून शेळ्या चोरी गेल्या आहेत. रात्रीच्या वेळी चोरटे मोटरसायकलने गावात फिरून चोरी करण्याचा ठिकाण लक्षात ठेवून त्यानंतर त्या चोरीला ते पूर्ण करतात. ग्रामीण भागात कित्येक अनोळखी व्यक्ती कोणत्याही धंद्याचा आधार घेऊन गावात फिरत असतात. त्यांच्याकडे स्वतःचा कोणताही ओळखपत्र राहत नाही. त्यामुळे गावकऱ्यांच्या संशयात ते चोरटे समजले जातात. त्यामुळे कित्येक गावातून त्यांना गावकऱ्यांनी हाकलून दिले आहे. विशेष म्हणजे शेळी चोरणारे हे वाहन सरळ जिल्ह्याबाहेर जात असते. शेळ्या कमी किमतीच्या असतात. त्यामुळे शेळ्या चोरीच्या गुन्ह्याकडे पोलिसांकडून फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही. एवढ्या कमी रकमेच्या चोरीसाठी किती त्रास घ्यायचा असा पोलिसांचा दृष्टिकोन असतो. परंतु सामान्य शेतकऱ्यांसाठी त्याची किंमत फार मोठी असते. अशा या प्रकारामुळे शेळी पालन करणाऱ्या नागरिकांमध्ये भीती असून पोलिसांनी तात्काळ अशा शेळ्या चोरट्यांचा शोध घेऊन शेळी पालन करणाऱ्या नागरिकांना न्याय द्यावा अशी मागणी शेळीपालकांनी केली आहे.

## पाच जुलैला गुणवंतांचा सत्कार सोहळा

**भंडारा:** सार्वजनिक वाचनालय भंडाराच्यावतीने मार्च २०२५ च्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा तसेच वाचनालयाच्या अभ्यासिकेतील यशस्वी झालेल्या मान्यवरांचा सत्कार सोहळा ५ जुलैला सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे. सार्वजनिक वाचनालयाच्या ईंद्रराज सभागृहात आयोजित या सत्कार सोहळ्यात महाराष्ट्र स्टेट बोर्डाच्या इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत तसेच सी.बी.एस.ई च्या दहावी व बारावीच्या परीक्षेत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येईल. सार्वजनिक वाचनालयाच्या अभ्यासिकेत अध्ययन करून शासकीय नोकरी प्राप्त करणाऱ्या मान्यवरांचाही यावेळेस विशेष सत्कार आयोजित करण्यात आला आहे, असे आवाहन सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय दलाल, कार्यवाह डॉ.जयंत आठवले यांनी कळविले आहे.

# शालार्थ आयडी घोटाळ्यातील शिक्षकांची उडाली झोप

### चौकशी समितीत आयएएस, आयपीएस अधिकारी

**राजेश बैस/साकोली**

राज्यात शालार्थ आयडी घोटाळा गाजत असून या घोटाळ्यातील काही आरोपी भंडारा जिल्ह्यातून अटक झाली असून पोलिसांकडून जिल्हाभर अटकसत्र सुरू आहे. त्यामुळे साकोली तालुक्यातील घोटाळेबाज शिक्षकांमध्ये धडकी भरली असून काही घोटाळेबाज शिक्षक अटकपूर्व जामीन घेण्याच्या तयारीत असून काही फरार होण्याच्या तयारीत आहेत. तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात सध्या हा विषय चर्चेचा असून तालुक्यात कुणाचा नंबर लागतो, याकडे शिक्षक, विद्यार्थी, पालक व नागरिकांत चर्चा आहेत.

नुकतेच शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी या प्रकरणाची एसआयटी चौकशी करून यात आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांचा समावेश करून चौकशी करण्यात येईल अशी घोषणा केली. त्यामुळे साकोली तालुक्यातील या घोटाळेबाज शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण असून कुणाला कधी अटक होईल हे सांगता येत नसल्याने या शिक्षकांमध्ये धडकी भरली आहे.

शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात शालार्थ आयडी घोटाळा मोठ्या प्रमाणावर झाला असून काही दिवसापासून या घोटाळ्यात आरोपी असलेले शिक्षण विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांचे अटकसत्र सुरू आहे. घोटाळ्यातील आरोपी शिक्षकांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून लाखो रुपयाची लाच देऊन अप्रुव्हल आणून घेतले. या घोटाळ्यात अंदाजे २७०० च्या वर बोगस शिक्षकांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती आहे.

सदर प्रकरण सध्या पावसाळी अधिवेशनात गाजत आहे. काही आमदारांनी या प्रकरणातील तपास लवकरात लवकर व्हावा याकरिता नवीन चौकशी समिती स्थापन करण्याची मागणी केली असून या समितीत अनुभवी आयएएस अधिकारी व आयपीएस अधिकारी यांची नियुक्तीची घोषणा शिक्षणमंत्र्यांनी केली आहे. आरोपी शिक्षकांकडून आतापर्यंत देण्यात आलेले पगार व एरियर्स सुद्धा वसूल करण्याची मागणी केली आहे.

सदर प्रकरणात काही शिक्षकांना राजकीय अभयसुद्धा असल्याचे आरोप आमदारांनी केले आहे. या प्रकरणाचा तपास सध्या पवनी तालुक्यात सुरू असून पवनी तालुक्यातून तीन शिक्षकांना अटक केल्याची माहिती आहे. साकोलीत पोलिसांचे पथक आल्याची गोपनीय माहिती असून साकोली तालुक्यात असे किती बहाद्दूर शिक्षक आहेत याची चर्चा तालुक्यात आहे. काही शिक्षक अटकपूर्व जामीनासाठी न्यायालयाच्या चकरा मारत आहेत. बऱ्याच शिक्षकांनी बँकेकडून कर्ज घेऊन घर, बंगले, कार घेतल्या असून जर त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले तर त्यांना नोकरीपासून हात धुवावे लागेल व अशा परिस्थितीत बँकांच्या कर्जाची परतफेड कशी करावी अशी ही चिंता या शिक्षकांना सतावू लागली आहे.

## खरीप पीक कर्जाची उचल करा

**भंडारा:** खरीप हंगामाकरीता शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप सुनिश्चित करण्यासाठी शासनाच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांच्या शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने भंडारा जिल्ह्यात विविध बँकांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणात पीक कर्जाचे वाटप करण्यात येणार आहे.जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राष्ट्रीयीकृत बँका, व्यावसायिक बँका आणि विदर्भ कोकण ग्रामीण बँक यांच्या माध्यमातून एकूण १,१०,०८० शेतकऱ्यांना ७६०३३ लाखांचे पीक कर्ज वितरीत करण्याचे लक्ष निर्धारीत करण्यात आले आहे. भंडारा जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी त्वरित पीक कर्जाची मागणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मंजूर रस्ता दुसरीकडे वळविला

### रस्त्यावर चिखलच चिखल, ग्रामपंचायतच्या कारभारावर संताप

**लोकशाही वार्ता/भंडारा**

तालुक्यातील केसलवाडा ग्रामपंचायत हद्दीतील तुळशीनगर रस्त्याला जोडणारा रस्ता महत्वाचा रस्ता असूनही ग्रामपंचायत सरपंच आणि ग्रामसेवकांचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. या रस्त्याच्या मजबुतीकरणाचे काम मंजूर असूनही तो दुसरीकडे वळविण्यात आल्याने या रस्त्याचे हाल सुरूच आहे.

या रस्त्याने दोन्ही बाजूंनी नागरिकांची घरे आहेत. शाळेची मुलं, नागरीक याच त्रासदायक रस्त्याचा उपयोग करतात. मात्र त्यांचा आटापिटा व त्रास ग्रामपंचायत केसलवाडा येथील सरपंच आणि सदस्य यांना दिसत नाही. मागील वर्षी सरपंचांनी त्यांचे घरासमोरील जागेत नवरात्री उत्सव साजरा करताना सर्व नागरिकांसमोर या रस्त्याचे काम आमदार निधीतून लवकरच करण्यात येणार असल्याचे सांगितले. लोकांना दाखविण्यासाठी तसे या कामाचे भूमिपूजनाचे आयोजन देखील केले. मात्र कामाला सुरुवात झाली नाही. या कामाबद्दल येथील नागरिकांनी विचारले असता कधी रेतीचा मुद्दा तर कधी निधी खर्चाचा मुद्दा समोर करून वेळ मारून नेली. सरपंच म्हणतात की, या रस्त्याने घरे कमी आहेत. म्हणून रस्ता बनवता येत नाही. तर काही लोकांना त्यांनी सांगितले की, तुम्ही ग्रामपंचायतमध्ये घरकर दिला नाही म्हणून रस्ता बनणार नाही. अशी उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, सर्व नागरिकांनी ग्रामपंचायतला घर कर, दिवाबत्ती कर, पाणी कर भरलेला आहे.

सरपंचांनी उन्हाळ्यात सिमेंटीकरण करण्यास मंजूर असलेला हा रस्ता सरळ उचलून आपल्या घराकडेच नेल्याचा आरोप स्थानिकांचा आहे. त्यांनी आपल्या घराकडे खडीकरण केलेल्या रस्त्यावर पुन्हा सिमेंट रस्ता बांधला, नालीचेही बांधकाम पूर्ण केले. शासकीय बोरवेल सुद्धा आपल्याच घरासमोर केली. हे करताना मात्र



त्यांनी तयार केलेल्या रस्त्यावर फक्त दोनच घरे आहेत, हे मात्र ते विसरल्याची टीकाही होत आहे. या रस्त्यावर नागरिकांना सोयीचे होईल म्हणून साधे मुरुमही घालण्याचा विसर सरपंचांना पडला आहे.

केसलवाडा ग्रामपंचायत लवकरच भंडारा नगर परिषदेमध्ये समाविष्ठ होत आहे. याच कारणामुळे सरपंच आणि ग्रामपंचायत प्रशासनाकडून या रस्त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

तसेच या रस्त्यावरील पथदिवे रात्रीला बंद राहत असल्याने शिकवणीला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना, नागरिकांना अंधारातून मार्गक्रमण करावे लागते. ग्रामपंचायत प्रशासनाने या समस्या सोडविण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे.

## अध्यक्षपदी ढाकचंद मुंगुसमारे, उपाध्यक्षपदी नंदलाल गौपाले

**लोकशाही वार्ता/तुमसर**




तालुक्यातील नाकाडोंगरी येथील नाकाडोंगरी को-ऑपरेटीव राईस मिल सोसायटी लिमिटेड, नाकाडोंगरी या प्रतिष्ठित सहकारी संस्थेच्या निवडणूकीत किसान विकास पॅनलने ११ पैकी ९ जागेवर दणदणीत विजय मिळवून सत्ता मिळविली असून या सोसायटीच्या अध्यक्षपदी ढाकचंद मुंगुसमारे यांची व उपाध्यक्षपदी नंदलाल गौपाले यांची एकमताने निवड करण्यात आली.

ढाकचंद मुंगुसमारे हे अत्यंत अनुभवसंपन्न व सहकार क्षेत्रात कार्यरत असून, त्यांनी यापूर्वीही विविध सामाजिक व संस्थात्मक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. यावेळी संचालक मंडळाचे सदस्य अनिल गौपाले, पुरुषोत्तम गौपाले, खुशाल पुष्पतोडे, सचिन गेडाम, दिलीप वाघाडे, माया गौपाले, योगिता बनसोड, कर्मचारी, व जि. प. सदस्य राजू देशभ्रतार, शिशुपाल गौपाले, ईश्वर गौपाले, रुपचंद सोनवाने, अजय गहाणे, श्रीराम पुष्पतोडे, नरेंद्र गौपाले, सेवक गौपाले, संजय गौपाले, शालीक गौपाले, विजय बन्सोड, विजय मालाधारी, कमलेश गौपाले, विजय राऊत, संजय गौपाले, कर्मचारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## हृदयघाताने वृद्धाचा मृत्यू

**भंडारा :** डॉक्टरकडे जात असताना ६० वर्षीय वृद्धाचा रस्त्यावरच मृत्यू झाल्याची घटना सोनेगाव (चिखलपहेला) येथे घडली. खेमराज बाबुराव वैद्य (६०, रा. सोनेगाव, चिखलपहेला) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. दि.२ जुलै रोजी दुपारी खेमराज वैद्य यांना छातीत दुखत असल्यामुळे ते स्वतः दुचाकी घेऊन डॉक्टरकडे जाण्यासाठी निघाले होते. मात्र सोनेगाव ते चिखलपहेला रस्त्यावरील स्मशानभूमीजवळ, अचानक त्यांची तब्येत बिघडल्याने ते गाडीसह रस्त्याच्या कडेला असलेल्या चिखलात पडले. या घटनेतच त्यांचा मृत्यू झाला.

## धान खरेदीच्या उद्दिष्टात वाढ करा

**मोहाडी :** रब्बी पणन हंगाम २०२४-२५ ऑनलाईन शेतकरी नोंदणी तसेच धान खरेदीचे उद्दिष्टांची मुदतवाढ ३१ जुलै पर्यंत वाढविण्यात यावी अशी मागणी किसान सभेच्या वतीने करण्यात आली आहे. रब्बी हंगामातील धान लागवडीखालील क्षेत्र विचारात घेता बहुतांश शेतकऱ्यांची नोंदणी झालेली नाही. तसेच शेतकऱ्यांचे ई-पिक पाहणी ॲप योग्य पध्दतीने काम करीत नाही. शेतकऱ्यांना सात बारा उतारा वेळेवर मिळत नाही. तसेच ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करताना येतात. अडचणीमुळे अनेक शेतकऱ्यांचे नोंदणी होण्याचे बाकी आहे. रब्बी पणन हंगामाकरीता ई-पिक पाहणीची अंतीम मुदत २९ जून पर्यंत वाढविण्यात आली. आता बरेच शेतकरी नोंदणी पासून वंचित आहेत.रब्बी पणन हंगाम २०२४ - २५ मध्ये ऑनलाईन शेतकरी नोंदणी करीता ३१ जुलैअखेरपर्यंत मुदतवाढ वाढविण्यात यावी. धान खरेदीच्या उद्दिष्टअभावी जिल्ह्यामध्ये धान खरेदी एक महीन्यापासुन बंद पडलेली आहे. तसेच ऑनलाईन पोर्टलमध्ये धान खरेदीचे कामकाज करतांना वेळोवेळी अडचणी येत असतात. त्यामुळे धान खरेदी होत नसल्यामुळे रब्बी पणन हंगाम शासनाकडून दिलेल्या मुदतीत संपुर्ण शेतकऱ्यांची धान खरेदी झालेली नाही.

## करडी महावितरण कार्यालयासमोर आंदोलन

### १६ तास वीजपुरवठ्यासाठी आमरण उपोषण सुरू




**लोकशाही वार्ता/मोहाडी**

मोहाडी तालुक्यातील करडी, जांभोरा, पालोरा व किसनपूर परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असलेला १६ तास वीजपुरवठा मिळावा, या मागणीसाठी २ जुलैपासून करडी येथील महावितरण कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

उपोषणाला माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष चरण वाघमारे, के. बी. चौरागडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या आंदोलनात परिसरातील सर्व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले असून शासनाच्या दुर्लक्षाविरुद्ध रोष व्यक्त केला. विजेच्या तुटवड्यामुळे खरीप हंगामावर संकट निर्माण झाले असून, वेळेवर सिंचन न झाल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. शासन व महावितरणने तात्काळ उपाययोजना कराव्यात, अन्यथा हे आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी पुरेशा प्रमाणात वीज उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. रात्रीच्या सुमारास मिळणाऱ्या विजेमुळे जीव धोक्यात घालून शेतकऱ्यांना काम करावे लागत असल्याने मोठा संताप व्यक्त होत आहे.

# जिल्ह्यातील दिव्यांगांना मिळणार रोजगार

### जिल्हा प्रशासन, 'यूथ फॉर जॉब्स फाउंडेशन' मध्ये करार



**लोकशाही वार्ता/भंडारा**

मुख्यमंत्री यांच्या सर्वसमावेशक युवा धोरणांतर्गत दिव्यांग व्यक्तींना रोजगार व उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी भंडारा जिल्हा प्रशासन आणि यूथ फॉर जॉब्स फाउंडेशन यांच्यात गुरूवारी (दि.३) रोजी सामंजस्य करार (करारनामा)करण्यात आला. हा करार जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडला. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी शैलजा वाघ व जिल्हा समाजकल्याण अधिकारी डॉ. संघमित्रा कोल्हे उपस्थित होत्या.

**कराराचे महत्त्वाचे उद्दिष्टे**

भंडारा जिल्ह्यातील सर्व दिव्यांग नागरिकांची एकत्रित अपंगत्व ओळख क्रमांक (युडीआयडी) नोंदणी पूर्ण करून त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे. दिव्यांग नागरिकांच्या गरजांचे मूल्यमापन करून त्यांची संख्या व स्वरूप ठरवण्यासाठी जिल्हास्तरीय सर्वेक्षण व नकाशांकन करणे. दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या गरजांनुसार आणि मागणीनुसार गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण देणे. हे प्रशिक्षण ऑनलाईन आणि प्रत्यक्ष प्रशिक्षणाचे एकत्रित स्वरूप (संयुक्त पद्धत) असेल. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या दिव्यांग उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे आणि इच्छुकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी मार्गदर्शन व सहाय्य करणे. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत समित्या, शैक्षणिक संस्था आणि इतर संबंधित यंत्रणांमध्ये दिव्यांग समावेशकतेबाबत जनजागृती करणे व यंत्रणांचे सक्षमीकरण करणे हा आहे.

### दिव्यांगांसाठी नव्या संधींचे दार खुले

या करारामुळे भंडारा जिल्ह्यातील अनेक दिव्यांग व्यक्तींना स्वाभिमानी, स्वतंत्र व सक्षम जीवन जगण्याचा मार्ग खुले होणार आहे. दिव्यांग उमेदवारांसाठी लवकरच विशेष नोंदणी मोहिमा, प्रशिक्षण कार्यशाळा आणि रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. यामुळेत्यांना प्रत्यक्ष रोजगार व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा आहे.

लोकशाही वार्ता
# गोंदिया
नागपूर, शुक्रवार, ४ जुलै २०२५/११




लोकशाही वार्ता
जिल्हा कार्यालय, गोंदिया
जिल्हा प्रतिनिधी : जयंत शुक्ला
पत्ता : दुसरा माळा, गौरक्षण मार्केट गोंदिया
संपर्क क्र ९८२२३८६९९९

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

## उपचारादरम्यान इसमाचा मृत्यू

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

डुग्गीपार पोलिस ठाण्यातंर्गत २३ जून रोजी पळसगाव परिसरात झाडावरून पडलेल्या इसमाचा नागपूर येथे उपचारदरम्यान मृत्यू झाला. प्रमोद चोपराम सय्याम (४०) रा.पळसगाव डव्वा असे मृतकाचे नाव आहे. शेतशिवारात झाडे कापत असताना प्रमोद झाडावरून खाली पडला. त्याचा उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला.

# पारंपरिक लोकगीतांच्या तालावर भात रोवणीला सुरुवात

## ‘ये बूढ़ी माय परा लगावन जासे’ च्या सुरांनी शेतशिवार गजबजले



**लोकशाही वार्ता / गोंदिया**

जिल्ह्यात मागील आठवडाभरापासून वरूणदेवाने चांगलीच कृपाद्दष्टी केली आहे. यामुळे खरीप हंगामाला घेऊन चिंताग्रस्त असलेल्या शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. त्यातच पावसाच्या आगमनाने सुखावलेल्या शेतकऱ्यांनी जोरदारपणे शेत कामांना सुरुवात केली. जिल्ह्यात दमदार पाऊस सुरू असल्याने अनेक शेतकऱ्यांनी १ जुलैपासून भात लावणीला सुरुवात केली आहे. शेतकरी, शेतमजुर पोवारी भाषेच्या पारंपारिक लोकगीतांच्या तालावर भाताची लागवड करीत आहेत. यामुळे शेतशिवारात गजबजले आहेत.

आजकाल पोवारी भाषेतील 'या बुढगी माये परा लगावं जासे, घर भर आदमीच आदमी सेती पर येला चयन कहां से' अशा प्रकारच्या लोकगीतांची धून शेत मळ्यात गुजंत आहे. गोंदिया जिल्ह्यातील मुख्य पीक भात आहे. येथील दीड लाखांहून अधिक शेतकरी कुटुंब भात शेतीवर अवलंबून आहेत. ग्रामीण भागात शेतकरी आपली जुनी परंपरा जपताना लोकगीतांच्या तालावर मोठ्या आनंदाने भात शेती करीत असतात.परंतु आधुनिक युगात पारंपारिक लोकगीते लुप्त होत चालली आहेत. म्हणजेच लोकगीते नवीन पिढीपासून दूर जात आहेत. गेल्या चार दिवसांपासून गोंदिया जिल्ह्यात दमदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत आहे आणि १ जुलैपासून जिल्ह्यातील बहुतेक ठिकाणी भात शेतीच्या कामाला वेग आला आहे. या दरम्यान शेतात पारंपारिक पोवारी भाषेतील लोकगीते ऐकू येत आहेत. गोरेगाव तालुक्यातील हिरापूर येथील अनेक शेतात पोवारी गाण्यांचा प्रतिध्वनी ऐकू येत आहे. ये डबूढ़ी माय परा लगावन जासे, घर भर आदमीच-आदमी सेती पर येला चयन कहां सेड' हे पोवारी लोकगीत गुंजत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी आपली जुनी संस्कृती व परंपरा टिकवून ठेवण्यासाठी याचा अवलंब करतात. भात लागवडीदरम्यान पारंपारिक लोकगीत गायल्याने वातावरण अधिक सुंदर बनते. व शेतात काम करताना शेतमजूरांना आळस पण येत नाही. त्यामुळे जास्त काम होते आणि आरोग्यही निरोगी राहते. असे शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

## मुख्य बाजारपेठेचा रस्ता हरविला खड्ड्यात

**आमगाव :** नगरातील मुख्य बाजारपेठ परिसरातील रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्ता खड्डेमय असून पावसाळ्यात चिखलमय झाला आहे. असे असूनही याकडे जनप्रतिनिधींकडून सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे खड्डेमय रस्त्यावरुन रहदारी करणे भाग पडत आहे. शिवाय चिखल निर्माण झाल्याने वाहन घसरून पडत आहेत. रस्ता खड्ड्यात हरविल्याने अपघातात वाढ झाली असून मोठ्या अपघातानानंतरच विभागातील अधिकाऱ्यांना जाग येणार का? असा प्रश्न संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

आमगाव नगर व्यापारी द्दष्टीकोनातून महत्वाचे शहर आहे. या ठिकाणी छत्तीसगढ, मध्यप्रदेश येथून व्यापारी व्यवसायासाठी येत असतात. तसेच क्षेत्रातील मोठी बाजारपेठ म्हणूनही आमगावला ओळखले जाते. परंतु, आजघडीला आमगाव समस्यांचे शहर झाले आहे. अरूंद रस्ते, अतिक्रमणाची समस्या कामय असतानाच आता खड्डेमय झालेले रस्ते नागरिकांच्या जीवावर उठले आहेत. आधीच समस्येने त्रस्त असलेल्या आमगावकरांना जर्जर रस्त्यांच्या समस्येला समोर जावे लागत आहे. मुख्य बाजारपेठेतील रस्ता पूर्णतः जर्जर झाला आहे.

# महिनाभरात उखडला डांबरीकरण रस्ता

## बोरा-सोनेगाव पुलावरील प्रकार



**लोकशाही वार्ता / तिरोडा**

तालुक्यातील बोरा-सोनेगाव पुलावरील मार्गाचे डांबरीकरण करण्यात आले. सदर काम करून महिनाभराचा अवधी लोटत नाही की, डांबरीकरण रस्ता उखडला आहे. या प्रकाराने निकृष्ट बांधकाम झाल्याचे समोर आले असून बांधकाम विभागाचा कारभार उजागार झाला आहे. त्यामुळे डांबरीकरणाच्या नावावर खिसे गरम करण्याचा काम झाल्याचा आरोप गावकऱ्यांकडून केला जात आहे.

बोरा-सोनेगाव मार्गाचे डांबरीकरण करण्यात आला. सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली करण्यात आले. काम करून महिनाभराचा कालावधी झाला असतानाच रस्त्यावरील डांबर उखडून मोठमोठे खड्डे निर्माण झाले आहेत. यामुळे निकृष्ट काम झाल्याचे दिसून येत आहेत. कंत्राटदार व अधिकारी यांनी संगनमताने थातूरमातूर काम करून खिसे गरम केल्याचा आरोप गावकरी आहेत. विशेष म्हणजे, डांबरीकरणासाठी बांधकाम विभागाच्या १८५ लक्ष रुपए खर्च करण्यात आल्याचे बोलले जात आहे. डांबरीकरण काम दर्जेदार होणे अपेक्षित होते. परंतु बोरा-सोनेगाव मार्गावर असलेल्या पुलाजवळच डांबर खचून खड्डे निर्माण झाले आहेत. यामुळे रस्ता डांबरीकरणच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येत आहे. यामुळे या कामाची उच्चस्तरीय चौकशी करून त्या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे तसेच या प्रकाराला अभय देणाऱ्या विभागातील अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

### अन्यथा पूल येणार धोक्यात

**बोरा-सोनेगाव मार्गावर असलेल्या कालव्यावर पुल आहे. यामुळे परिसरातील गावकऱ्यांचे आवागमन सुरळीत सुरू असते. त्यातच जवळपास १८५ लक्ष रुपए खर्चून रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले. मात्र महिनाभरातच डांबरीकरण रस्ता खड्डेमय झाला असून ठिकठिकाणाहून डांबर उखडला आहे. विशेषतः पुलाजवळील रस्ता खचत असून निकृष्ट काम झाल्याचे चव्हाट्यावर आले आहे. या प्रकाराने पुलाला धोका निर्माण झाला असून मोठ्या अप्रिय घटनेला अधिकारी व कंत्राटदाराकडून निमंत्रण दिले जात आहे का? असा प्रश्न गावकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.**

## दृष्टिक्षेप

### घरफोडी करून साहित्य लंपास

**गोंदिया :** तिरोडा पोलिस ठाण्यातंर्गत गौतम बुध्द वॉर्ड तिरोडा येथे घरफोडी करून अज्ञात चोरट्याने १४ हजार रुपए किंमतीचे साहित्य लंपास केल्याची घटना १ जुलै रोजीची आहे. फिर्यादी महिलेच्या घरी अज्ञात चोरट्याने घरफोडी करून तांदूळ, गॅस सिलिंडर व बर्तन असा एकूण १४ हजार रूपयाचा मुद्देमाल लंपास केला. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पोहवा मडावी करीत आहेत.

### शिवीगाळ करून मारहाण

**गोंदिया :** रावणवाडी पोलिस ठाण्यातंर्गत गिरोला येथे शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना ३० जून रोजीची आहे. फिर्यादी महेंद्र विठोबा बिसेन रा.गिरोला हे घरासमोर असताना आरोपी नितेश रहांगडाले याने क्षुल्लक कारणावरून वाद निर्माण केला. तसेच शिवीगाळ करून साहित्याने मारून जखमी केले. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पोहवा गौरे करीत आहेत.

### दुचाकीला घेऊन दोघांमध्ये जुंपली

**गोंदिया :** तिरोडा पोलिस ठाण्यातंर्गत धादरी येथे दुचाकी रस्त्यावर ठेवल्याच्या कारणावरून दोघांमध्ये हाणामारी झाल्याची घटना १ जुलै रोजीची आहे. फिर्यादी निकेश शेंदरे रा.धादरी याने आपली दुचाकी गावातील रस्त्यावर ठेवली असता तीन आरोपींनी वाद निर्माण केला. तसेच फिर्यादीला काठीने मारून जखमी केले. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास सफौ तिरपुडे करीत आहेत.

### बसस्थानकातून दुचाकी लंपास

**गोंदिया :** सालेकसा पोलिस ठाण्यातंर्गत बसस्थानक परिसरातून अज्ञात चोरट्यांनी दुचाकी लंपास केल्याची घटना १ जुलै रोजी उघडकीस आली. फिर्यादी महेंद्र हुकरे रा.गिरोला यानी आपली दुचाकी क्र.एमएच-३५/डब्ल्यु-७८०० बसस्थानक परिसरात ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी डाव साधून लंपास केली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### पिंडकेपार रेल्वे स्थानकात सोयी-सुविधांचा अभाव



**गोरेगाव :** रेल्वे प्रशासनाकडून नेहमीच प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्याचा दावा करण्यात येत असला तरी प्रत्यक्षात हा दावा फोल ठरत असल्याचा प्रकार दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या गोंदिया रेल्वे स्थानकात अखत्यारित येत असलेल्या गोंदिया-बल्लारशाह रेल्वे मार्गावरील पिंडकेपार रेल्वे स्थानकावर दिसून येत आहे. महत्वाचे म्हणजे येथील रेल्वे स्थानकावरील सोयी सुविधांचा अभाव असल्याने प्रवासांना अनेक समस्यांना समोर जावे लागत आहे. पिंडकेपार रेल्वे सिानक हे गोंदिया - बल्लारशाह रेल्वे मार्गावरील छोटे रेल्वेस्थानक आहे. नागझिरा जंगल परिसराला लागून पिंडकेपारपासून दोन ते तीन किमी अंतर आहे. रेल्वेस्थानकावरुन दररोज मोठ्या प्रमाणात प्रवासी ये-जा करतात. परंतु, सोयी सुविधांअभावी प्रवाशांना अनेक समस्यांना समोर जावे लागत आहे. याकडे रेल्वे प्रशासनाने लक्ष देवून उपाययोजना कराव्यात अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

# धानखरेदी सुरू करून अडलेले चुकारे त्वरित अदा करा



### सभागृहात आ.राजकुमार बडोले यांनी वेधले लक्ष

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या समस्यांना केंद्रस्थानी आणत, अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार राजकुमार बडोले यांनी औचित्याचा मुद्दा मांडला. राज्य शासनाने दिलेले धानखरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. परंतु, अनेक शेतकरी अद्यापही धानविक्रीपासून वंचित आहेत. यामुळे उद्दिष्ट वाढवून धानखरेदी सुरू करण्यात यावे तसेच अडलेले चुकारे शेतकऱ्यांना त्वरित अदा करण्यात यावे, अशी मागणी आ.राजकुमार बडोले यांनी विधी मंडळात केली.

गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात यावर्षी उन्हाळी धानाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले आहे. मात्र, धान खरेदीची प्रक्रिया अर्ध्यावरच थांबवण्यात आल्याने शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात धान शिल्लक राहिले आहे. यामुळे शेतकऱ्यांना धान खराब होण्याची शक्यता आहे वरून धान विक्री न झाल्यास आर्थिक अडचणींचा सामना शेतकऱ्यांना करावा लागेल. त्यामुळे त्यांनी सरकारकडे धान खरेदीची मर्यादा वाढविण्याची मागणी केली आहे. ‘शेतकऱ्यांचे धान विक्री न झाल्यास त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागेल. त्यामुळे सरकारने तातडीने धान खरेदीची मर्यादा वाढवून खरेदी प्रक्रिया सुरू करावी,’ अशी मागणी त्यांनी केली. शिवाय आदिवासी विकास महामंडळाने यावर्षी खरेदी केलेल्या धानाच्या चुकाऱ्यांबाबतही गंभीर मुद्दा उपस्थित केला. महामंडळाने खरेदी केलेल्या धानाचे पैसे अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाहीत. ऐन पेरणीच्या हंगामात शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ‘शेतकऱ्यांना पेरणीच्या वेळी पैशांची गरज असते. मात्र, थकीत चुकाऱ्यांमुळे त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला आहे. सरकारने त्वरित धानाचे चुकारे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावे,’ अशी मागणी त्यांनी केली.

## पावसाळ्यात उघड्या रोहित्रामुळे धोका


**गोंदिया :** गोंदिया शहरातील मनोहर चौक येथे असलेले ट्रान्स्फॉर्मरखालील डीपी बॉक्स धोकादायक अवस्थेत आहेत. ठिकठिकाणच्या या बॉक्सची दुरवस्था झाली असून, फ्यूज बॉक्स गायब आहेत. त्यामुळे आता पाऊस सुरू झाला की विजेचा धक्का बसून दुर्घटना घडण्याचा धोका असतो. त्यासाठी याबाबत तातडीने करण्याची गरज आहे. शहरात व ग्रामीण भागात अनेक ठिकाणी मुख्य रस्त्यालगत ट्रान्स्फॉर्मर व त्याखाली फ्यूज बॉक्स आहेत. या ट्रान्सफॉर्मरला झाडा-वेलींनी वेढले गेले असून, बॉक्सचीही दुरवस्था असल्याचे चित्र पाहायला मिळते. तसेच या डीपीतील फ्यूज शॉर्टसर्किटने काळे पडून अस्तव्यस्त झालेल्या असतात. त्यामुळे त्या ठिकाणचा परिसर स्थानिकांसाठी धोकादायक बनू लागला आहे.

# ककोडी येथे आरोग्य तपासणी व जनजागृती शिबिर

**देवरी :** जिल्ह्यात धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान ४९ गावात राबविण्यात येणार आहे.त्यातुन शासनाच्या विविध योजना व त्याचा लाभ गावपातळीवरील आदिवासी लोकांना पोहचविणे आहे.जिल्हाचे शेवटचे टोक असलेल्या ककोडी येथे २७ जुन रोजी ग्रामपंचायत येथे प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडी यांचे मार्फत धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत आरोग्य मेळाव्यात आरोग्य तपासणी व जनजागृती शिबीर संपन्न झाल्याची माहीती वैद्यकीय अधिकारी डॉ.पल्लवी रामटेके यांनी दिली आहे.

२७ जून रोजी ककोडी येथील आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान आरोग्य मेळावा घेण्यात आले. यामध्ये शासनाच्या सर्व विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते. प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडीच्या वतीने आरोग्य विभागाचा स्टॉल लावण्यात आला. या ठिकाणी अंसासर्गिक कार्यक्रमाच्य अनुशंगाने रक्तदाब व मधुमेह तपासणी, सिकलसेल तपासणी, रक्तगट सोबतच गरजु लोकांची वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत आरोग्य तपासणी व समुपदेशन करुन औषधोपचार करण्यात आला.आरोग्य विभागाच्या जनजागृती स्टॉल मध्ये क्षयरोग, कुष्ठरोग, सिकलसेल, हिवताप, स्टॉप डायरीया, मलेरिया व इतर राष्ट्रीय कार्यक्रमाच्या बॅनर व पोष्टरच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आल्याची माहीती प्राथमिक आरोग्य केंद्र ककोडीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.पल्लवी रामटेके यांनी याप्रसंगी दिली आहे. आरोग्य मेळाव्या दरम्यान वैद्यकीय अधिकारी डॉ.पल्लवी रामटेके व डॉ.सैय्यद आरोग्य सेविका प्रिती कळमकर,आरोग्य सेवक ढालीसंग बिसेन,आशा सेविका धनुबाई धनगाये, राजकुमारी मडावी, सुशिला सलामे, स्टाफ ब्रदर राजेश घाटे,डाटा एन्ट्री ऑपरेटर आशिक अंबादे, गट प्रवर्तक शोभा राऊत व ललिता पटले यांनी उपस्थिती राहून आरोग्य सेवा दिली.

# नगर परिषदेच्या लेखा विभागाच्या स्लॅबचे प्लॅस्टर कोसळले



**लोकशाही वार्ता / गोंदिया**

स्थानिक नगर परिषदेची इमारत संपूर्ण जिर्ण झाली आहे. पावसाळ्याच्या दिवसात या इमारतींच्या छताला ठिकठिकाण गळती लागत होती. यामुळे सर्व कागदपत्रांचे देखील मोठे नुकसान होत होते. अशीच घटना १ जुलै रोजी नगर परिषदेच्या लेखा विभागात घडली आहे. या विभागाचे स्लॅबचे प्लॉस्टर अचानक पडले. यामध्ये कुठली अनुचित घटना घडली नाही.

न.प.ची इमारत पूर्णतः जिर्ण झाली आहे. येथे स्लॅबचे प्लॅस्टर अनेक वेळा खाली पडल्याच्या घटना घडल्या आहेत. यामुळे ही इमारत येथील कर्मचाऱ्यांसाठी जीवघेणी ठरत आहे. या इमारतीचे बांधकाम १९८० मध्ये झाले आहे.जवळपास ४५ वर्ष पूर्ण झाले आहे. ज्यामुळे इमारतीचे छत पूर्णतः खस्ता झाले आहे. अशातच छताचे प्लॅस्टर तुटून पडत आहे. अशाप्रकारची घटना १ जुलै रोजी दुपारी जवळपास २.३० वाजता दरम्यान लेख विभागातून समोर आली आहे. येथे अचानक स्लॅबचे प्लॉस्टर खाली पडले. परंतु या घटनेत कार्यालयात कुणालाही इजा झाली नाही.

# संपूर्ण जिल्हा पूर्ववतपणे नक्षलग्रस्त ठेवा



## जनता शिक्षक महासंघाची प्रमुख मागणी

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

मागील काही वर्षापासून गडचिरोली जिल्ह्याप्रमाणे संपूर्ण गोंदिया जिल्हा ही नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो या आदिवासी बहुल जिल्ह्यामध्ये वारंवार नक्षली कारवाया घडून येतात. यामुळे येथील सर्व विभागातील कर्मचाऱ्यांना १५ टक्के नक्षलग्रस्त प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. परंतु २७ जून २०२५ च्या गृह मंत्रालयाच्या नुकत्याच निघालेल्या शासन निर्णयान्वये जिल्ह्यातील सडक अर्जुनी, तिरोडा, गोरेगाव व आमगाव असे चार तालुके वगळण्यात आलेले आहेत. म्हणजे जवळपास अर्धा जिल्हा वगळलेला आहे यामुळे जिल्ह्याला मिळणारा विकास निधी व कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये खूप मोठा फरक पडणार आहे.

ही बाब लक्षात येताच जनता शिक्षक महासंघ व भाजप शिक्षक आघाडी गोंदिया परिवाराकडून प्रथम गोंदिया जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष व मनमिळाऊ मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.एम.मुरुगनाथन यांची बदली रद्द केल्यामुळे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन आ.परिणय फुके यांचा सत्कार करण्यात आला व निवेदन देऊन हे वगळण्यात आलेले तालुके पूर्ववत ठेवावेत अशी महत्त्वाची मागणी करण्यात आली. त्याचबरोबर गोंदिया जिल्ह्यामध्ये कार्यरत असलेल्या कला, क्रीडा, कायार्नुभव या निदेशक शिक्षकांना कायम करून न्यायालयीन आदेशाप्रमाणे अर्धवेळ वेतन देण्यात यावे, तसेच २०१९ नंतर गोंदिया जिल्ह्यातील आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांना एक वेतन वाढ देण्यात यावी.अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. यावेळी माननीय आमदार परिणयजी फुके यांनी या सर्व बाबीवर योग्य विचार करून निर्णय घेऊ असे संघटनेला आश्वासन दिले.

यावेळी जनता शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण आंधळे, भाजप शिक्षक आघाडी राज्य सदस्य अरुण पारधी, चरणदास डहारे,लिलेश्वर बोरकर, शिक्षक भारती अध्यक्ष रवी अंबुले, उपाध्यक्ष गोपीनाथ ठुले, लोकनाथ तितराम,अनिरुद्ध केंद्रे, मनोज हरिनखेडे शरद बोंद्रे प्रकाश घुगे,भारत सोनटक्के कैलास आव्हाड, इत्यादी शिक्षक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दशकाच्या सेवेनंतरही आरोग्य कर्मचारी कंत्राटीच!

## तात्काळ समायोजनाची मागणी

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी पैकी १० वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे नियमित शासन सेवेत समायोजनास होत असलेल्या विलंबाबाबत व कर्मचारी यांच्या वेतनवाढ, बदली धोरण, मागण्यांबाबत येत्या १० ते १७ जुलै या दरम्यान मुंबई येथे आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत १० वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांची १४ मार्चच्या शासन निर्णयानुसार शासन सेवेत समायोजन करण्योसाठी शासन निर्णय दिला होता. परंतु सव्वा वषार्पेक्षा जास्त कालावधी होऊन गेला तरीही शासन निर्णयाबाबत अंमलबजावणी झालेली नाही. १४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार समायोजन व इतर न्याय मागण्यांबाबत शसनमार्फत पुढे काहीही कार्यवाही होत नसल्याने १४ दिवशीय कृती आराखड्याप्रमाणे आंदोलन करणार आहेत.

कम्रचारी संघटना एकत्रीकरण समितीच्या वतीने संपूर्ण राज्यभर ३० जून रोजी एक दिवसीय लक्षवेध आंदोलन एकत्रिकरण समितीच्या माध्यमातून व इतर राज्य समन्वयक आणि जिल्हास्तरीय अधिकारी व कर्मचारी यांच्या नेतृत्वात करण्यात असाले. कोरोना काळात सर्वांचे दारे बंद होती तेव्हा आपल्या व आवल्या कुटुंबाची पर्वा न करता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी, कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी व परिचारिकांसह आरोग्य कर्मचाऱ्यंनी अत्यंत महत्त्वाची सेवा दिली. २०२२ मध्ये उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांना दहा वर्षे व त्यापेक्षा अधिक सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या समकक्ष व शैक्षणिक पात्रतेप्रमाणे शासन सेवेत थेट समायोजन करण्यात यावे असे निर्देश दिले आहेत.

राज्यभरातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचाऱ्यांनी २७ दिवस संप आंदोलन करून शासनाने न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली आहे.



### अशा आहेत मागण्या

**औरंगाबाद उच्च न्यायालय निकालाची अंमलबजावणी करणे, शासन आदेशानुसार समायोजन उर्वरित ६९ संवर्ग यांचे समकक्ष पदावर व शैक्षणिक अहतेर्नुसार रिक्त पदांवर समावेशन व्हावे, एका वेळचे बदली धोरण समुदाय आरोग्य अधिकारी यांचा जीआर प्रमाणे तात्काळ लागू करण्यात यावा. एनएचएम कर्मचाऱ्यांना मानधन वाढ १० टक्के व नियमित लागू असलेली ५ टक्के मानधनात वाढ तात्काळ लागू करण्यात यावी, सर्व कर्मचारी यांना इन्शुरन्स व ईपीएफ पॉलिसी लागू करणे आदी मागण्यांचा समावेश आहे.**

लोकशाही वार्ता
# गडचिरोली
नागपूर, शुक्रवार, ४ जुलै २०२५/१२
गुड मॉर्निंग
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

## सिरोंचात ३५ हजारांची दारू जप्त

**सिरोंचा :** शहरातील वॉर्ड १६ मध्ये एका विक्रेत्याने विक्रीसाठी दारू आणल्याची माहिती मिळताच सिरोंचा पोलिस व मुक्तीपथ तालुका चमूने संयुक्तिक कृती करीत ३५ हजार १६० रुपयांची देशी विदेशी दारू जप्त केली. सिरोंचा शहरातील वॉर्ड नंबर १६ मध्ये चार दारू विक्रेते सक्रिय आहेत. एका विक्रेत्याने तेलंगणा राज्यातून दारू आणली असल्याची गुप्त माहिती मिळाली. प्राप्त माहितीच्या आधारे पोलिस व मुक्तिपथ टीमने धाड टाकली असता चारचाकी वाहनात दारू आढळून आली. विक्रेता घटनास्थळावरून पसार झाला. यामध्ये ९० एम एल १५० विदेशी तसेच १४३ नग देशी दारू मिळून आली. असा एकूण ३५ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे शहरातील विक्रेत्यांमध्ये खळबळ निर्माण झाली आहे.

## सख्ख्या भावाला फावड्याने मारहाण

**आष्टी :** चामोर्शी तालुक्यातील कढोली येथे शेतातून बैल नेल्याच्या कारणावरून सख्ख्या भावाला फावड्याने मारहाण करून जखमी केले. ही घटना ३० जून रोजी दुपारी २ वाजता घडली. कुशन दिनू वाकूडकर (६५, रा. कढोली) असे जखमीचे नाव आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, ३० जून रोजी ते शेतात पावसाचे साचलेले पाणी फावड्याने बाहेर काढून देत होते. यावेळी तेथे पुतण्या रितीक राजू वाकूडकर, भाऊ राजू वाकूडकर व भावजय वर्षा राजू वाकूडकर हे आले. त्यांनी कपाशीच्या शेतातून बैल का नेले, अशी कुरापत काढत खाली पाडून फावड्याने मारहाण केली. यात ते जखमी झाले. त्यांच्या फिर्यादीवरून आष्टी ठाण्यात या तिघांवर गुन्हा नोंदविण्यात आला. तपास हवालदार विलास शेडमाके हे करत आहेत.

### दृष्टिक्षेप

## रेगडी येथे नवीन बँक शाखा सुरू करावी

**घोट :** परिसरातील रेगडी येथे अजूनही कोणतीच बँक शाखा नसल्याने परिसरातील नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. वरिष्ठांनी याकडे लक्ष देऊन रेगडी येथे नवीन बँक शाखेची स्थापना करावी, अशी मागणी प्रशांत शाहा यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाकडे केली आहे. रेगडी या गावात परिसरातील मुख्य बाजार पेठ असून पोलिस स्टेशन, शासकीय आश्रमशाळा व इतर शासकीय निमशासकीय संस्था आहेत तसेच रेगडी गावांतर्गत सुमारे १३ ते १४ गावांचा देखील समावेश आहे. मागील तीन ते चार वर्षांपूर्वी रेगडी येथे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मंजूर करण्यात आली होती परंतु अजून ती शाखा सुरू झाली नाही. रेगडी येथे नवीन बैंक शाखेची स्थापना करावी, अशी मागणी प्रशांत शाहा केली आहे.

## अंबेझरा गावात दारूविक्री बंद

**गडचिरोली :** अहेरी तालुक्यातील अंबेझरा या गावाला घनदाट जंगल व धबधब्याच्या रूपाने नैसर्गिक सौंदर्य लाभलेले आहे. या गावात मुक्तिपथ व गाव संघटनेच्या वतीने सघन बैठकीचे आयोजन करून ग्रामस्थाना जागृत करण्यात आले. आता गावात दारूविक्री केली जात नाही. अंबेझरा गावाची लोकसंख्या ८५ असून २२ घरांची वस्ती आहे. हे गाव घनदाट जंगलात असून नजीकच धबधबा आहे. यामुळे या गावाची पर्यटनस्थळाच्या दृष्टीने वेगळी ओळख आहे. पूर्वी या गावात सणासुदीला मोहफुलाची दारू गाळली जात होती. मुक्तिपथतर्फे दोन दिवस सघन भेट बैठक आयोजित करण्यात आली. गावात विविध व्यसनाचे कार्यक्रम घेण्यात आले आणि व्यसनामुळे होणारे दुष्परिणाम लोकांना समजवून सांगण्यात आले.

# गोंडवाना विद्यापीठाच्या संशोधन केंद्राला 'श्री वसंतराव नाईक कृषी पुरस्कार'

### गोंडवाना विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा



**लोकशाही वार्ता/ गडचिरोली :** गोंडवाना विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात, राज्याचे कृषिमंत्री ना. माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते गोंडवाना विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान संशोधन केंद्राला प्रतिष्ठित स्व. वसंतराव नाईक कृषि पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

हा पुरस्कार विशेषत्वाने गोंडवाना विद्यापीठाच्या गडचिरोली येथील विज्ञान व तंत्रज्ञान संशोधन केंद्राला मिळाला आहे, जे राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या प्रेरणेने २०१४ साली स्थापन करण्यात आले आहे. या केंद्राच्या स्थापनेत स्वप्नील गिरडे, गंधर्व पिलारे, आशिष घराई यांचे सहकार्य आणि प्रगती गोखले, डॉ. सी.डी. माई, डॉ. अनिल काकोळकर आणि डॉ. शहा यांची प्रेरणा उल्लेखनीय आहे.

गडचिरोली हा महाराष्ट्रातील आदिवासी बहुल व दुर्गम जिल्हाअसून, येथे शिक्षणाच्या व विशेषतः विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सुविधा तुलनेने कमी उपलब्ध आहेत. ही कमतरता दूर करण्यासाठी स्थापन झालेले हे केंद्र गडचिरोली जिल्ह्याच्या शैक्षणिक व सामाजिक विकासामध्ये एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. हे केंद्र ग्रामीण विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यात व त्यांना आधुनिक तंत्रज्ञानामध्ये पारंगत करून देण्यासाठी मोलाचे कार्य करते. शिक्षण गुणवत्ता सुधारणे, कौशल्य विकास, रोजगार निर्मितीला चालना, सामाजिक बदल व स्थानिक समस्यांवर उपाय हे उद्देश समोर ठेवत हे केंद्र गडचिरोलीच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ बनले आहे. एक कृषी क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल आणि नावीन्यपूर्ण संशोधनाद्वारे शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी केलेल्या प्रयत्नांची दखल म्हणून या पुरस्काराने विद्यापीठाला सन्मानित करण्यात आले आहे. विद्यापीठातील आदिवासी बहुलक्षेत्रामध्ये व ग्रामीण युवकांसाठी करीत असलेल्या परिश्रमासाठी विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्राचे कार्य महाराष्ट्रासाठी आदर्श आहे.

> **भविष्यातही कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कटिबद्ध राहू - कुलगुरू डॉ. बोकारे**
>
> यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी, हा पुरस्कार केवळ गोंडवाना विद्यापीठाचा नव्हे, तर येथील सर्व प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमाचे फलित आहे. विशेषतः राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राने कृषी क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे हा सन्मान मिळाला याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आम्ही भविष्यातही कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कटिबद्ध राहू, असेही कुलगुरू डॉ. बोकारे म्हणाले.

# समोरील वाहनास दुचाकी आदळून दुचाकीस्वार ठार

### एटापल्ली- आलापल्ली मार्गावरील गुरुपल्लीनजीकची घटना



**एटापल्ली :** मागुन जाणाऱ्या दुचाकीस्वाराचे संतुलन बिघडल्याने दुचाकी घसरली. दरम्यान समोर जात असलेल्या पिक अप वाहनास दुचाकीने धडक दिल्याने या अपघातात दुचाकीस्वार ठार झाल्याची घटना बुधवार २ जुलै रोजी एटापल्ली - आलापल्ली मार्गावरील गुरुपल्लीनजीक घडली. रघु आत्राम (२३) रा. पंदेवाही असे मृतकाचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार एटापल्लीकडून आलापल्लीकडे पीक अप क्रमांक एम एच ३३ टी २९९६ जात असतांना रघू आत्राम हा एमएच ३३ एएफ - १९६७ क्रमांकाच्या दुचाकीने मागोमाग येत होता. दरम्यान त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले व दुचाकी घसरली. मात्र ती थेट पिकअप वाहनास जाऊन धडकली. धडक एवढी जबरदस्त होती की, बाईक चालकाचा जागेवरच मृत्यू झाला. पोलीसांना माहिती मिळताच पोलिस अपघात स्थळी हजर झाले पंचनामा करून मृतकाचे प्रेत एटापल्ली येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. पुढील तपास एटापल्ली पोलिस करीत आहेत.

# दोन कारवायात दारूसह २० लाखांचा मुद्देमाल जप्त

### चार आरोपी अटकेत; गडचिरोली पोलिसांची कारवाई




**लोकशाही वार्ता/ गडचिरोली :** गडचिरोली शहर पोलीस ठाण्याचा कार्यभार स्वीकारताच ठाणेदार पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण यांनी अवैध धंद्यांविरुद्ध कारवाईचे अस्त्र उगारले आहे. अशातच बुधवार, (दि.२) शहर पोलिसांद्वारे दोन वेगवेगळ्या ठिकाणी राबविलेल्या कारवायात देशी-विदेशी दारु, दोन चारचाकी, एक दुचाकी असा एकूण २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली असून एक दारु तस्कर पळून जाण्यात यशस्वी झाला आहे.

शहर पोलिसांद्वारे पहिली कारवाई शहरापासून जवळच असलेल्या पारडी फाट्याजवळ पार पाडली. या ठिकाणी चारचाकी वाहनाच्या सहाय्याने दारुची तस्करी करणाऱ्या दोन तरुण दुचाकीने रेकी करीत होते. पोलिसांना सापळा रचित प्रारंभी दुचाकी चालविणाऱ्या दोन तरुणांना जेरबंद केले. त्यानंतर चारचाकी वाहनाची तपासणी केली असता वाहनात १ लाख ६९ हजार ८०० रुपये किंमतीची दारु आढळून आली. यासह एम. एच. ४९ एफ. ०९६१ क्रमांकाची चारचाकी वाहन व एम. एच. ३३ ए. एच. ३३६३ क्रमांकाची दुचाकी असा एकूण ६ लाख ६९ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या दारु तस्करी प्रकरणी रेकी करणाऱ्या गणेश चन्नावार रा. कोटगल व समीर बोरकर रा. इंदाळा यांचेससह चारचाकीने दारुची तस्करी करणारा अमोल रतन चन्नावार रा. कोटगल व त्याच्या साथीदार सुमित दौलत जनबंधू यांना ताब्यात घेण्यात आले.

दुसरी कारवाई चंद्रपूर मार्गावर न्यायालय परिसरात करण्यात आली. एम. एच. ४० बीजे ७९८६ या क्रमाकांचे चारचाकी वाहना संशयास्पद स्थितीत फिरतांना आढळून आले असतांना वाहनाला थांबविण्याचा प्रयत्न केला असता वाहनाने चंद्रपूर जिल्ह्यात पळ काढला. दरम्यान सावली तालुक्यात व्याहाड गावाजवळ आरोपींनी वाहन घटनास्थळी ठेवून पोबारा केला. यावेळी वाहनात ३ लाख ५२ हजार रुपए किंमतीची दारु तसेच १० लाख रुपये किंमतीचे चारचाकी वाहन असा एकूण १३ लाख ५२ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी फरार आरोपी सुनिल गोवर्धनदास पंजवानी रा. रामनगर याच्यावर दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर कारवाई ठाणेदार विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनात महिला पोलिस निरीक्षक माधूरी मिसाळ, कृष्णा जुआरे, डीबी पथकाचे स्वप्नील कुडावले, तुषार खोब्रागडे, स्वदीप मेश्राम, अतुल भैसारे, गोविंद केकान आदींनी पार पाडली.

# लखमापूर बोरी इथे निघाली मशाल फेरी



**लोकशाही वार्ता/ लखमापूर बोरी :** चामोर्शी तालुक्यातील लखमापूर बोरी येथे महाराष्ट्र राज्य कृषी विभागांतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा - ०२ चा प्रचार-प्रसार करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून संपूर्ण गावात मशाल फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

प्रकल्प आराखड्याच्या नियोजनाकरिता गावात बैठक घेऊन योजनेचा प्रचार करण्यासाठी गावातून मंगळवार दि. १ जुलैला शाळकरी मुलांची प्रभातफेरीमध्ये ठेऊ पाण्याचा ताळेबंद, घालू दुष्काळाला पायबंद, मिळून करू शेतीचा विकास, आपला गाव होईल झकास यांसारखे घोषवाक्ये देण्यात आले. तसेच गाव संसाधनाचा नकाशा काढून गावातील उपलब्ध व अनुपलब्ध अंतर्भुत घटकांचा अभ्यास करण्यात आला, तसेच लोकसहभाग मिळविण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी श्रमदान करण्यात आले तसेच शिवारफेरी करून मृदा व जल संधारण कामे प्रस्तावीत करण्यात आली. तसेच नियोजित चार दिवसामध्ये शाळकरी मुलांच्या संकल्पनेतून काही कल्पना घेऊन गाव विकास करता यावे म्हणून त्यांना माझ्या स्वप्नातील गाव या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात येणार आहे व अखेर ग्रामकृषी समिती मार्फत प्रकल्पा अंतर्गत शेतकऱ्यांची मागणी व प्रस्तावित केलेल्या कामाचा आराखडा मंजूर करण्याकरीता ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रकल्प नियोजनाकरीता ग्राम कृषी विकास समिती, सचिव आर. व्ही. कुळसंगे, सरपंचा किरण सुरजागडे, उपसरपंच विनोद भोयर व सर्व सदस्य व गावकरी तसेच मंडळ कृषी अधिकारी पी. पी गजभिये, उपकृषी अधिकारी डी. बी. चापले, सहाय्यक कृषी अधिकारी पी. के वालदे, भेंडाळाचे सहाय्यक कृषी अधिकारीबी. जी. कोहचले, एस. डी. निमगडे, कृषी सेवक बी. एस. धोटे यांचे सहकार्य लाभले.

# नागेपल्लीच्या महिलांनी दिला ग्रामपंचायतला घेरावाचा इशारा

### समस्या सोडविण्यासाठी आक्रमक



**लोकशाही वार्ता/ अहेरी :** नागेपल्ली ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या प्रभाग क्रमांक २ मधील विविध समस्यांकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने तेथील संतप्त महिलांनी ग्रामपंचायत कार्यालय गाठून त्या समस्यांचे निवेदन सादर केले. या समस्या तत्काळ सोडवा, अन्यथा ग्रामपंचायतीला घेराव घालण्याचा इशारा या संतप्त महिलांनी दिला.

नागेपल्ली ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या विविध प्रभागांमध्ये अनेक समस्या आ-वासून आहेत. प्रभाग क्रमांक २ मध्ये देखील अनेक समस्या असून पावसाळ्यात नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेष म्हणजे प्रभाग क्रमांक २ ही सुशिक्षित नागरिकांची वस्ती असून या प्रभागातील नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडून आकारलेले विविध कर वेळोवेळी भरले आहेत. मात्र ग्रामपंचायतचे इतर प्रभागांप्रमाणेच या ही प्रभागाकडे दुर्लक्ष होत असल्याने येथील महिलांनी बुधवारी (२ जुलै) थेट ग्रामपंचायत कार्यालय गाठून संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

यावेळी झालेल्या चर्चेत समस्या त्वरित सोडविण्याची मागणी केली. निवेदन देताना पुष्पा रंगुवार, योगिता सोनलवार, उजयता कुंदोजवार, उर्मिला चौधरी, संगीता भजने, संघमित्रा जनबंधू, गीता गर्जे, विमल तरेवार, निर्मला सरवर, किरण चिट्टीवार, मोनिका मुजुमदार, सत्यशिला देवगडे, सुनीता करमे, रूपा अनुमानला, लक्ष्मी इप्पाला आदी महिला उपस्थित होत्या.

**काय आहेत समस्या आणि मागण्या?**

जल जीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा नियमित सुरू करणे, वर्षातून किमान दोनदा नाल्यांची सफाई करणे, कचराकुंड्या नियमित सफाई करणे, दररोज घंटागाड्या प्रभागात फिरविणे, नाली सफाई करून व्यवस्थित पूर्ववत झाकणे, वीज पुरवठा खंडित होणार नाही याकडे लक्ष देणे, रस्त्यावरील वीजेच्या खांबांवरील बंद असलेले दिवे लावणे, डासनाशक फवारणी करणे, आरोग्याच्या दृष्टिकोनातून स्वच्छता राखणे तसेच प्रभागात झालेल्या सिमेंट रस्त्यांची दुरवस्था लक्षात घेऊन नवीन सिमेंट रस्त्यांचे बांधकाम करणे, एवढेच नव्हे तर पावसाळ्यात कुठे रोगराई उद्भवणार नाही याकडे ग्रामपंचायत प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, आदी मागण्यांचा यात समावेश होता. ग्रामपंचायत अधिकारी लोमेश वाळके यांना हे निवेदन देण्यात आले.

# संपर्क तुटणाऱ्या गावांत साहित्य पोहोचवण्यासाठी वापरणार ड्रोन

### जिल्ह्यात पहिल्यांदाच होणार वापर



**गडचिरोली :** पावसाळ्याच्या दिवसात विदर्भात सर्वाधिक आपत्तींचा सामना करावा लागणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यात यावर्षीही प्रशासनाने सर्व प्रकारची तयारी केली आहे. त्यात नाविन्यपूर्ण प्रयोग म्हणून पुरामुळे संपर्क तुटणाऱ्या गावांमध्ये अत्यावश्यक औषधी किंवा इतर साहित्य पुरवठा करण्यासाठी ड्रोनचा वापर केला जाणार आहे. विशेष म्हणजे राज्यात पहिल्यांदा गडचिरोली जिल्ह्यात साहित्य पोहोचवण्यासाठी ड्रोनचा वापर होणार आहे. या पायलट प्रोजेक्टसाठी आयआयटी मुंबई या संस्थेची मदत घेतली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी दिली. पूरपरिस्थितीत सर्वाधिक आरोग्याशी निगडीत समस्या निर्माण होतात. त्यामुळे संपर्क तुटणाऱ्या ११२ गावांमध्ये आधीच पुरेसा औषधीसाठा पोहोचवण्यात आला आहे. तसेच पावसाळ्याच्या तीन महिन्यात प्रसुती होऊ शकणाऱ्या गर्भवती महिलांना माहेरघर म्हणून आधीच आरोग्य संस्थेत आणण्यात आले आहे. याशिवाय तीन महिने पुरेल एवढे अन्नधान्यही संपर्क तुटणाऱ्या गावातील स्वस्त धान्य दुकानांमध्ये साठवून ठेवण्यात आले आहे.

दरम्यान नदी-नाल्यांना पूर असल्यास आवश्यक औषधी किंवा इतर साहित्य तातडीने पोहोचवण्याची गरज भासल्यास ड्रोनचा वापर केला जाणार आहे. पूरस्थितीत अनेक वेळा वीज पुरवठा खंडीत होतो. त्यामुळे मोबाईल टॉवर काम करत नसल्याने संपर्क सुविधा ठप्प पडते. अशावेळी तातडीने संदेशाचे आदान-प्रदान करण्यासाठी प्रत्येक तहसील कार्यालयात वॉकी-टॉकीची सुविधाही देण्यात आली आहे.

**मदतीसाठी विविध चमू तयार**

पावसाळी आपत्तींवर मात करण्यासाठी एसडीआरएफची चमू ३ महिन्यांसाठी जिल्ह्यात दाखल झाली आहे. याशिवाय केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तीन चमू तैनात आहेत. राज्य राखीव पोलीस दलाचीही एक चमू तयार आहे. गरज पडेल त्यावेळी एनडीआरएफची चमू तात्काळ पोहोचणार आहे. याशिवाय सर्व धोकादायक ठरू शकणाऱ्या भागांमध्ये २९९ प्रशिक्षित आपदा मित्र हे गावकरी आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा यांच्यातील दुवा बनून सक्रिय राहणार आहेत.

# पावसामुळे पेरणीच्या कामास वेग, १६ .७८ टक्के क्षेत्रात पेरणी

### जिल्ह्यातील नदी-नाले भरले तुडूंब, शेतकऱ्यांची वाढली लगबग



**गडचिरोली :** आर्द्रा नक्षत्रात बऱ्यापैकी पाऊस पडत असल्याने पेरणीस वेग आला असून जिल्ह्यात धान तसेच अन्य पिके मिळून १६.७८ टक्के क्षेत्रात पेरणी झाली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. ज्या शेतकऱ्याकडे सिंचनाची सुविधा आहे असे शेतकरी रोवणीच्या तयारीसही लागले असल्याचे दिसुन येत आहे.

कृषी विभागाकडून प्राप्त माहितीनुसार गडचिरोली तालुक्यामध्ये धान पिकाखालील एकुण सरासरी क्षेत्र १४८६६.१६ हेक्टर असून या पैकी ४४५.६० हेक्टरवर पऱ्हे भरण्यात आले तसेच ८४४.०० हेक्टर क्षेत्रावर आवत्या टाकण्यात आले आहेत. धानोरा तालुक्यामध्ये धान पिकाखालील सरासरी क्षेत्र २१०८०.५० हेक्टर असून या पैकी ७२१.०० हेक्टरवर पऱ्हे भरण्यात आले आहेत तसेच ३१०५.०० हेक्टर क्षेत्रावर आवत्या टाकण्यात आले आहेत.

चामोर्शी तालुक्यामध्ये धानपिका खालील एकुण सरासरी क्षेत्र २७८१९.५६ हेक्टर आहे. यापैकी १९८६.२० हेक्टरवर पऱ्हे भरण्यात आले आहेत तसेच ६९२१.०० हेक्टर क्षेत्रावर आवत्या पद्धतीने धानाची पेरणी करण्यात आली आहे. मुलचेरा तालुक्यामध्ये धान पिका खालील सरासरी क्षेत्र ९३३८.७० हेक्टर आहे. या पैकी १२२.०० हेक्टरवर पऱ्हे भरण्यात आले आहेत तसेच २६४.०० हेक्टर क्षेत्रावर आवत्या भरले आहेत. देसाईगंज तालुक्यामध्ये धान पिकाखालील सरासरी क्षेत्र १०८२५.५५ हेक्टर आहे. या पैकी १०१३.२० हेक्टर वर पऱ्हे भरण्यात आले आहेत तसेच ७६६.८० हेक्टर क्षेत्रावर आवत्या पद्धतीने धानाची पेरणी करण्यात आली आहे.

आरमोरी तालुक्यामध्ये धान पिकाखालील एकुण सरासरी क्षेत्र १८७३५.३१ हेक्टर आहे. यापैकी १३३०.९० हेक्टर वर पऱ्हे भरण्यात आले आहेत तसेच ५४५१.९५ हेक्टर क्षेत्रावर आवत्या टाकण्यात आले आहेत. कुरखेडा तालुक्यामध्ये धान पिकाखालील एकुण सरासरी क्षेत्र १७१७२.७९ हेक्टर आहे. या पैकी १३५४.१२ हेक्टर वर पऱ्हे भरण्यात आले आहेत तसेच ८४५.१० हेक्टर क्षेत्रावर आवत्या पद्धतीने धानाची पेरण केली आहे. कोरची तालुक्यामध्ये एकुण सरासरी १००८३.३६ हेक्टर क्षेत्र असून या पैकी ४९५.६० हेक्टर वर पऱ्हे भरण्यात आले आहेत तसेच २९५७.८७ हेक्टर क्षेत्रावर आवत्या टाकण्यात आहेत. अहेरी आले तालुक्यात १८२९१.९९ हेक्टर क्षेत्रापैकी०.०० हेक्टर वर पऱ्हे व ३.०० हेक्टर क्षेत्रावर आवत्या टाकण्यात आले आहेत.

एटापल्ली तालुक्यामध्ये १७८१४.२४ हेक्टर क्षेत्रापैकी १३५.०० हेक्टरवर पऱ्हे व ८०९.०० हेक्टर क्षेत्रावर आवत्या, सिरोंचा तालुक्यामध्ये ५५३०.०९ हेक्टर क्षेत्रापैकी ८५.०० हेक्टर वर पऱ्हे तसेच ६९७.०० हेक्टर क्षेत्रावर आवत्या पद्धतीने धानाची पेरणी करण्यात आली आहे.

> **पेरणीमध्ये सिरोंचा तालुक्याची आघाडी**
>
> जिल्ह्यात खरीप हंगामात सर्व पीके मिळुन १ लाख ९३ हजार ८६५.६७ हेक्टर क्षेत्र आहे. आतापर्यंत १६.७८ टक्के क्षेत्रात खरीप पीकांची पेरणी झाली आहे. सिरोंचा तालुक्याने पेरणीत आघाडी घेतली असून या तालुक्यात ३२.७१ टक्के क्षेत्रात खरीप पिकांची पेरणी झाली आहे. गडचिरोली तालुक्यात ७.०८ टक्के क्षेत्रात, धानोरा तालुक्यात १६.०६ टक्के क्षेत्रात, चामोर्शी तालुक्यात ३०.२३ टक्के क्षेत्रात, मुलचेरा तालुक्यात ४.४५ टक्के क्षेत्रात, देसाईगंज तालुक्यात ११.३४ टक्के क्षेत्रात, आरमोरी तालुक्यात ३०.५० टक्के क्षेत्रात, कुरखेडा तालुक्यात ६.८९ टक्के क्षेत्रात, कोरची तालुक्यात २९.२९ टक्के क्षेत्रात, अहेरी तालुक्यात ७.७४ टक्के क्षेत्रात, भामरागड तालुक्यात ०.०० टक्के क्षेत्रात, एटापल्ली तालुक्यात ५.०९ टक्के क्षेत्रात, सिरोंचा तालुक्यात ३२.७१ टक्के क्षेत्रात धानाची पेरणी झाली आहे.

## तळेगाव येथील तरुण युवकाची आत्महत्या

**कुरखेडा :** तालुक्यातील तळेगाव येथील युवक मयुर रामचंद्र गद्देवार(२०) या युवकांनी ३ जून रोजी सायंकाळी सहा वाजेच्या दरम्यान राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याने तळेगावात एकच खळबळ माजली आहे.आई वडील शेतावर कामावर गेले होते लहान भाऊ सूद्धा घरी नसताना त्याने घरीतील सिलींगं फ्यानच्या हूकाला गळफास लावत आत्महत्या केली आत्महत्या करण्यामागे नेमके काय कारण कळू शकले नाही. घटनेची माहिती मिळताच साहायक पोलिस निरीक्षक प्रियंका आघाव यानी घटणास्थळावर पोहचत पंचनामा केला व शव उत्तरीय तपासणी करीता उपजिल्हा रूग्णालय कूरखेडा येथे पाठवले घटनेचा पूढील तपास कुरखेडा पोलिस स्टेशनचा वतीने करण्यात येत आहे.

लोकशाही वार्ता
# अकोला-वाशीम
गुड मॉर्निंग
नागपूर, शुक्रवार, ४ जुलै २०२५/ १०
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### वृद्धेची आत्महत्या

**तुमसर :** तुमसर तालुक्यातील आसलपानी गावात राहणाऱ्या एका वयोवृद्ध महिलेने मानसिक अस्वस्थतेमुळे विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना २ जुलै रोजी उघडकीस आली आहे. गोबरवाही पोलिस ठाण्यात मर्ग नोंदविण्यात आला आहे. पुस्तकला हरीराम उईके (६७, रा. आसलपानी) असे मृतकचे आहे. मृतक पुस्तकला काही काळापासून मानसिक आजाराने त्रस्त होत्या आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते.

# राष्ट्रसंतांच्या विचारांचा जागर

## कारंजात कार्यकर्ता मेळावा, अनेकांनी घेतले पादुकाचे दर्शन

**लोकशाही वार्ता/कारंजा**

अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ द्वारा संचालित श्री. गुरुदेव सेवा मंडळ, श्री.गुरुदेव महिला व पुरुष भजनी मंडळ कारंजा तालुक्याच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या चरण पादुका प्रचार यात्रेच्या निमित्ताने कारंजा येथील श्री.गुरुदेव सेवाश्रम ग्रामनाथ भवनात गुरुदेव सेवा मंडळ परिवाराचा भव्य दिव्य मेळावा पार पडला. यावेळी उपस्थितांकडून राष्ट्रसंत वंदनीय तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा जागर करण्यात आला तर अनेक राष्ट्रसंत भक्तांनी राष्ट्रसंतांच्या चरणपादुकांचे दर्शन घेतले.



राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेचे व साहित्याचे प्रचारक स्व. छाया गावंडे, स्व. उमेश मधुकर कडोळे, स्व. गौरीशंकर देवघरे, स्व. हरिभाऊ लक्ष्मणराव दुर्गे तसेच विमान अपघातामध्ये शहीद झालेल्यांना श्रद्धांजली देऊन या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या कार्यकर्ता मेळाव्याचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष अरविंद लाठिया यांच्या अध्यक्षते खाली माजी नगराध्यक्ष दत्तराज डाहाके यांच्या हस्ते आणि श्री गुरुदेव सेवा मंडळाचे ज्येष्ठ प्रचारक श्रीकृष्ण पाटील नेमाने, पत्रकार सुधीर देशपांडे, विजय काळे, विदर्भ लोककलावंत संघटनेचे अध्यक्ष, संपादक संजय कडोळे, सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर व्यवहारे, श्रीकृष्ण पाटील मुंदे, डॉ. दिलीपराव गावंडे, ज्योती उगले, वाशीम जिल्हा महिला सेवाधिकारी, सीमा सातपुते, महिला भजन प्रमुख यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये संपन्न झाला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या चरण पादुकांचे आगमन १ जुलै रोजी दुपारी ४ ते ५वाजताच्या दरम्यान श्री.गुरुदेव सेवाश्रम ग्रामनाथ भवन शांतीनगर येथे झाले. याप्रसंगी श्री गुरुदेव आश्रम गुरुकुंज मोझरीचे मध्यवर्ती प्रतिनिधी ह.भ.प.प्रकाश महाराज वाघ, ह.भ.प. सुशील महाराज वनवे, प्रचार सचिव प्रचार विभाग गुरुकुंज आश्रम यांनी सखोल असे मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रसंताच्या विचाराची तसेच ग्रामगीतेची व इतर साहित्याची आज देशाला गरज आहे. या विषयावर प्रत्येकाने आपापले मनोगत व्यक्त केले. गुरुकुंज मोझरी ते पंढरपूर जाणाऱ्या पालखीचे पूजन राजलक्ष्मी दत्तराज डाहाके, ज्योती प्रकाश पाटील ढेरे, बेबी बाळू पाटील दुर्गे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रचार यात्रेमधील सेवाधारयांचा सत्कार तसेच कारंजा येथील सर्वधर्म सामुदायिक प्रार्थना सुरू केलेल्या महिला भजनी मंडळांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन करण्यात आला. सर्व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भाविका भक्तांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला. तसेच गुरुदेव सेवा मंडळ तसेच महिला पुरुष भजनी मंडळ राष्ट्रसंताच्या ग्रामगीता व इतर साहित्याचे प्रचारक गुरुदेव प्रेमी तसेच श्री. गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांची मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# डॉ. सुहास काटे यांना योगरत्न पुरस्कार प्रदान

**लोकशाही वार्ता/अकोला**

अकोला जिल्हा येथील सुप्रसिद्ध योग प्रशिक्षिक डॉ. सुहास काटे यांना अलीकडेच आयुष्य इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, ए.जी. एम. ए. व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, डॉक्टर सेल आयुष विभाग वतीने अतिशय प्रतिष्ठेचा योगरत्न पुरस्कार मोठ्या थाटात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) येथे प्रदान करण्यात आला.



या पुरस्काराला महाराष्ट्रातील योग शिक्षक, योग थेरपीस्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये शिक्षण सम्राट समजल्या जाणारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी डॉक्टर सेलचे प्रदेश अध्यक्ष डॉक्टर श्री बाळासाहेब पवार हे कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक म्हणून उपस्थित होते.

सोबत पाहुण्यांमध्ये उद्योजक मनोज दांडगे उपस्थित होते तर, प्रमुख उपस्थितीमध्ये डॉक्टर नितीन राजे पाटील आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन व्हाईस चेअरमन तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी डॉक्टर सेल प्रदेश कार्याध्यक्ष (आयुष विभाग) डॉक्टर सतीश कराळे चेअरमन आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, डॉक्टर बाबुराव कानडे अध्यक्ष आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, दिशा चव्हाण, प्रशांत सावंत, प्रा. कुणाल महाजन, मनोहर कानडे व इतर आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

# राजस्थान महाविद्यालयात इंडक्शन प्रोग्रामचे उद्घाटन

**लोकशाही वार्ता/वाशीम**

स्थानिक राजस्थान महाविद्यालयात ३० जून रोजी बीएससी फर्स्ट ईयरच्या विद्यार्थ्यांसाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना महाविद्यालया तील विविध विभागांची ओळख तसेच नवीन शैक्षणिक प्रणाली धोरणांतर्गत असलेले बदल विद्यार्थ्यांना माहिती होण्याकरिता, इंडक्शन प्रोग्रामचे उद्घाटन संपन्न झाले.




या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत विज्ञान विभाग प्रमुख तसेच सूक्ष्मजीवशास्त्र या विभागाच्या प्रमुख डॉ. रचना पचोरी यांनी विद्यार्थ्यांना अकॅडमीक बँक ऑफ क्रेडिटची माहिती देऊन महाविद्यालयामध्ये असलेल्या विविध विभागांचा थोडक्यात परिचय करून दिला व इंडक्शन प्रोग्रामचे त्यांच्या भविष्यातील शिक्षणासाठी असलेला उपयोग याबद्दल माहिती दिली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओमप्रकाश झंवर यांनी महाविद्यालयाच्या स्थापनेपासून आतापर्यंतचा महाविद्यालयाचा यशस्वी प्रवास विद्यार्थ्यांना सांगितला व या महाविद्यालयात अकरावी ते पीएच. डी.पर्यंतचे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत असून विद्यापीठामध्ये अनेक विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये येण्याची महाविद्यालयाची परंपरा कायम आहे, असे विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितले.

याप्रसंगी त्यांनी प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे स्वागत करून विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयामध्ये प्राविण्य मिळवून स्वतः सोबतच महाविद्यालया चा नावलौकिक वाढवावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप गोरे य तर आभार प्रदर्शन डॉ. राजेश रिसोडकर यांनी केले.

या कार्यक्रमासाठी समन्वयक डॉ. गजानन वडणकर, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रदीप पाटील, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एन व्ही राठोड ,प्रा. मनोज मोरे ,प्रा. पृथ्वीराज सदार, प्रा. गोटे, प्रा. वानखेडे आणि बीएससी प्रथम वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते या कार्यक्रमासाठी संस्थाध्यक्ष ठाकूरदासजी मालानी, सदस्य शीला राठी व सचिव सुधीर राठी आणि प्राचार्य डॉ.ओमप्रकाश झंवर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# शिरपूरजवळ अपघातात एक जण ठार, दुसरा जखमी

**लोकशाही वार्ता/वाशीम**

राष्ट्रीय महामार्गावर शिरपूर येथील रिसोड फाटा परिसरात उभ्या असलेल्या ट्रकवर दुचाकी स्वार धडकल्याने भीषण अपघात झाला. यामध्ये ओम बाळूराम बहिरे (१९ वर्षे) या तरुणाचा जागेवरच मृत्यू झाल्या तर कार्तिक विलास कव्हर हा गंभीर जखमी झाला आहे.



२९ जून रोजी संध्याकाळी आठ वाजताच्यादरम्यान हे दोन्ही तरुण मालेगावकडून शिरपूरकडे दुचाकीवर बसून येत होते. दरम्यान मालवाहू ट्रक रिसोड फाटा परिसरातील राष्ट्रीय महामार्गावर उभा होता. दुचाकीस्वार ट्रकच्या पाठीमागच्या भागाला वेगाने येऊन धडकला.

ही धडक एवढी जबरदस्त होती की ट्रकचा अँगल पुरेपूर वाकल्या गेला. या अपघातामध्ये ओम बाळू राम बहिरे, रा. वाघी बुद्रुक हा या तरुणाचा जागेवरच मृत्यू झाला आहे. कार्तिक विलास कव्हर रा. वाघी बुद्रुक हा गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर सध्या हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच शिरपूर पोलिस स्टेशनचे पीएसआय इम्रान खान पठाण तसेच पोलिस कॉन्स्टेबल हरिहर गवंडे व इतर कर्मचाऱ्यांनी अपघातग्रस्तांना त्वरित रुग्णालयात हलविले. घटनास्थळी जाऊन आरटीओ वाशीम यांनी घटनास्थळाला भेट दिली. सदर अपघाताचा पुढील तपास शिरपूर पोलिस करीत आहेत.

# सरपंच आरक्षणाची बुधवारी सोडत

**अकोला :** सन २०२५ ते सन २०३० या पाच वर्षांच्या कालावधीत अकोला तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सरपंचपदाचे जातीनिहाय आरक्षण नव्याने निश्चित करावयाचे आहे. याकरिता जाहीर सोडत बुधवार, ९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता डी.बी.ए. हॉल, तहसील कार्यालय येथे आयोजित केली आहे. अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग अंतर्गत महिलाकरिता व खुल्या प्रवगाअंतर्गत महिलाकरिता आरक्षणाची सोडतही आयोजित केली आहे.तरी सरपंच, तसेच महिला सरपंच पदाच्या सोडतीसाठी सर्व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आहे.

# सावत्र बापाकडून मुलाचा खून, मृतदेह जंगलात फेकला

**लोकशाही वार्ता/अकोला**

नऊ वर्षांच्या चिमुरड्या मुलाचा सावत्र बापाने गळा आवळून खून केला व मुलाचा मृतदेह जंगलात फेकला. ही क्रूरतेची घटना अकोट पोलिसांनी उजेडात आणली. अकोट येथील दर्शन वैभव पळसकर या मुलाचा सावत्र वडील आकाश साहेबराव कान्हेरकर याने गौरव वसंतराव गायगोले या मित्राच्या मदतीने गळा आवळून खून केला आणि त्याचा मृतदेह अकोला व अमरावती जिल्ह्याच्या सीमेवरील जंगलात फेकून दिला.

२ जुलै रोजी सकाळी साडे आठ वाजता दर्शन हा कुणालाही न सांगता घराबाहेर पडल्याची माहिती त्याच्या आईने पोलिसांना दिली.अकोट शहर पोलिस ठाण्यात बेपत्ता तक्रार दाखल झाली. तपासाच्या सुरुवातीला पोलिसांना सावत्र वडिलांवर संशय गेला, कारण नुकत्याच बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दर्शन आपल्या वडिलांसोबत जाताना दिसून आला होता.यातून तपासाची दिशा स्पष्ट होत गेली आणि चौकशीत आकाशने गुन्ह्याची कबुली दिली. त्याने आपल्या मित्रासोबत दर्शनला दुचाकीवर जंगलात नेले आणि गळा आवळून हत्या केली.

गुन्ह्याची कबुली मिळाल्यानंतर अकोट पोलिसांनी १२ तास जंगल परिसरात शोध घेत मृतदेह शोधून काढला. सध्या मृतदेह अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. या अमानवी हत्येतील धक्कादायक बाब म्हणजे, आकाशने आपल्या मित्राला फक्त ३०० रुपयांच्या मोबदल्यात या गुन्ह्यात सहभागी करून घेतले. गौरव गायगोले नावाच्या या तरुणाला अटक करण्यात आली आहे.

उपविभागीय पोलिस अधिकारी अनमोल मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्ह्याचा तपास सुरू असून दोघा आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अकोटसह संपूर्ण जिल्ह्यात या घटनेमुळे संतापाची लाट उसळली असून, आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



# अनुसूचित जमातीच्या महिलांना कृषी आधारित उद्योगाबाबत मार्गदर्शन

**लोकशाही वार्ता/वाशीम**

कृषी विज्ञान केंद्रच्या वतीने कृषी दिनानिमित्त अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी मुसळवाडी येथे १ जुलै रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुरुवातीला कल्याणी म्हस्के यांनी कार्यक्रमाचे समन्वयन करत कार्यक्रमामागील उद्दिष्टे समजावून सांगितली. या महिलांना कृषी व कृषी आधारित उद्योगांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमात वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र काळे , विषयविशेषज्ञ डॉ. डी. एन. इंगोले आणि मयुर देशमुख यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमात डॉ. रवींद्र काळे यांनी महिलांशी संवाद साधताना कृषीपूरक व्यवसायांची गरज, नियमित उत्पन्नाचे स्रोत, शाश्वत उपजीविकेचा महत्त्व यावर प्रकाश टाकला. त्यांनी शेळी पालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेतीपूरक प्रक्रिया उद्योग व गांडूळखत निर्मिती यासारख्या व्यवसायांमधील संभाव्य संधींबाबत माहिती दिली. डॉ. डी. एन. इंगोले यांनी महिलांना कृषी अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून लघुउद्योजकतेच्या संकल्पना, शेतीमाल मूल्यवर्धन आणि संस्थात्मक कर्ज व अनुदान योजनांची माहिती दिली. श्री. मयुर देशमुख यांनी उपस्थित महिलांना कुक्कुटपालन तंत्रज्ञान, तसेच गांडूळखत निर्मिती व त्याच्या व्यवस्थापनावर सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात मुसळवाडी गावातील अनुसूचित जमातीच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रोजगार सहाय्यक निरंजन भारत लोखंडे व राजू लाठर यांनी सहकार्य केले.

# निराधार योजना लाभार्थ्यांना उत्पन्नात दाखला व दारिद्र्यरेषा कार्डची अट शिथिल करण्याची मागणी

**लोकशाही वार्ता/मंगरूळपीर**

मंगरूळपीर तहसील अंतर्गत संजय गांधी निराधार योजनाच्या लाभार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे हयातीचे दाखले मागविले जात आहेत. हयातीचे दाखले मागविणे व त्यासोबत आधारकार्ड व बँकेचे पासबुकाची झेरॉक्स घेणे, याबाबत वाद नाही परंतु हयातीचे दाखल्यासोबत प्रत्येक लाभार्थ्यास २१ हजार रुपयांचे उत्पन्नाचा दाखला मागविल्या जात आहे. २१ हजार रुपये उत्पन्नाच्या दाखल्यासाठी तलाठी यांच्याकडून दारिद्र्यरेषा प्रमाणपत्राची मागणी केली जात आहे. या जाचक अटी रद्द कराव्या अशी मागणी शेख नवेद यांनी उपविभागीय अधिकारी यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.




निवेदनाचा आशय असा की अशा लाभार्थ्यांना तलाठी व त्यांच्या कार्यालयात काम करणारे खासगी कर्मचारी/दलाल यांच्यामार्फत मोठ्या प्रमाणात आर्थिक लुबाडणूक करून उत्पन्नाचे दाखले दिले जात आहेत. जे लाभार्थी दलालामार्फत उत्पन्नाचे दाखले मिळविण्यांस असमर्थ आहेत त्यांची ससेहोलपट होत आहे.ज्यावेळेस संजय गांधी लाभार्थी योजनेचे अर्ज पात्र केले जातात तेव्हा त्यांच्याकडून आवश्यक दाखविले मागविले जातात.

संजय गांधी योजनेचे लाभ घेणारे लाभार्थी हे विधवा, परीत्यक्ता, दुर्धर आजाराचे रोगी, इ. लाभार्थ्यांचे उत्पन्न दरवर्षी कुठून वाढणार? मग त्यासाठी हयातीचे दाखल्यासोबत उत्पन्नाचे दाखले मागण्यांचे कारण काय? आणि मागितलेच तर त्यासाठी दारीद्र रेषेचे प्रमाणपत्राची जाचक अट कशासाठी? केवळ दलाल व तलाठी कार्यालयात काम करणारे खाजगी लोकांचे भल्यासाठी अशा जाचक अटी लावल्या जातात काय? असा सवाल जनता विचारीत आहे.

संजय गांधी योजनेचे लाभाथ्यार्ना हयातीचे दाखल्यासोबत उत्पन्नाचे दाखल्याची अट तत्काळ रद्द करावी, अन्यथा संजय गांधी योजनेचे लाभार्थ्यांसह उपविभागीय कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असे निवेदनात नमूद केले आहे.

# कीर्तनकार गोलमेज परिषदेचे हभप गणेश हुंबाड यांना निमंत्रण

**लोकशाही वार्ता/वाशीम**

श्री क्षेत्र आळंदी येथे जुलै महिन्यात आयोजित दोन दिवसीय महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदेसाठी वाशीम जिल्ह्यातील महागाव येथील भागवताचार्य कीर्तनकार हभप गणेश महाराज हुंबाड यांना निमंत्रित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील ५० निवडक कीर्तनकारांना निमंत्रित करण्यात आले असून त्यात गणेश महाराज हुंबाड यांचा सहभाग असणे ही वाशीम जिल्ह्यासाठी अभिमानास्पद बाब मानली जात आहे.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि स्कूल ऑफ एज्युकेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने १९ आणि २० जुलै रोजी क्षेत्र आळंदी येथे महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषद आयोजित करण्यात आली. असून वारकरी संप्रदायाची २१ व्या शतकातील सामाजिक प्रबोधनाची दिशा, स्वरूप आणि वाटचाल हा या परिषदेतील चर्चासत्राचा विषय आहे.

एमआयटी शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल वि.कराड महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे मुंबई अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे देहूकर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर आणि राष्ट्रीय सरपंच परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील यांच्या स्वाक्षरीचे २५जून रोजी निमंत्रण पत्र हुंबाड महाराजांना प्राप्त झाले आहे.

आदर्श मानवी संस्कृतीच्या निर्मितीचे लोककल्याणकारी कार्य करणाऱ्या आणि विविध जलवंत सामाजिक प्रश्नांच्या निराकरणासाठी मूलभूत मार्गदर्शन करणाऱ्या वारकरी सांप्रदायाला आधुनिक समजल्या जाणाऱ्या २१ व्या शतकात कुठल्या प्रमुख ज्वलंत लोकप्रशानाच्या निराकरणासाठी प्रबोधन कार्य करावे लागणार आहे, हे लक्षात घेऊन त्यानुसार प्रबोधनकार यांचे स्वरूप व दिशा कशी असेल ते कार्य यशस्वी करण्यासाठी वारकरी संप्रदायाला कुठल्या समस्या व आव्हानांना सामोरे जावे लागेल विविध स्तरावर वारकरी संप्रदायाला कुठले ठोस सहकार्य अपेक्षित आहे. याविषयी या परिषदेत विचार मंथन केले जाणार आहे.

# रोटरी ॲग्रोसिटीचा पदग्रहण सोहळा उत्साहात

## अध्यक्ष शशांक जोशी यांनी पदभार स्वीकारला

**लोकशाही वार्ता/अकोला**

सामाजिक सेवा कार्यात सदा सक्रिय असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ अकोला ॲग्रोसिटीचा पदग्रहण सोहळा स्थानीय सेन्ट्रल प्लाझा सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३०चे २०२६-२७चे प्रांतपाल डॉ. राजेश पाटील, रोटरीचे एजीपीपी अनिल अग्रवाल यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या या पदग्रहण सोहळ्यात नूतन अध्यक्ष शशांक जोशी यांनी मावळते अध्यक्ष गुणवंत देशपांडे यांच्याकडून सन २०२६-२७ साठी पदभार स्वीकारला. तर नूतन सचिव संगीता चौधरी यांनी मावळते सचिव ॲड. संतोष पाटील यांच्याकडून पदभार स्वीकारला.




कार्यक्रमाचा प्रारंभ दीप प्रज्वलन व तनवी घोगरे, अक्षरा पाटील या बालिकेच्या गणेश वंदनेने करण्यात आला. यावेळी मावळते अध्यक्ष व सचिव यांनी आपल्या गतवर्षाच्या लेखाजोखा सादर केला. तर नूतन अध्यक्ष शशांक जोशी यांनी युनाईट फॉर गुड या वर्षाच्या क्लब थीम प्रमाणे उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली. मान्यवरांनी उपस्थितांना पद शपथ देऊन त्यांच्या उपस्थितीत हा पदग्रहण सोहळा थाटात संपन्न झाला. या नूतन कार्यकारणीत अध्यक्ष शशांक जोशी, सचिव संगीता चौधरी, उपाध्यक्ष नारायण कळमकर,सहसचिव रवींद्र शिंदे व आर्कि. किरण ढवळे, कोषाध्यक्ष अनिल दिंडोकार, डायरेक्टर मेडिकल प्रोजेक्ट सुनीता देशपांडे, डायरेक्टर नॉन मेडिकल प्रोजेक्ट ज्योती तळोकार, डायरेक्टर पब्लिक रिलेशन्स अमित कोल्हटकर, डायरेक्टर क्लब ॲडमिनिस्ट्रेशन पीपी नीरज देशमुख, डायरेक्टर मेंबरशिप मुक्ता धाडे, सर्जंट आर्म्स दिनेश नंदवंशी,पुढील अध्यक्ष ॲड. संतोष पाटील, आयपीपी गुणवंत देशपांडे, ग्रीटिंगचेअर प्रीती ढवळे आदी पदाधिकारी कामकाज बघणार आहेत. प्रमुख पाहुणे डॉ. राजेश पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. रोटरी क्लब ही केवळ प्रकल्प राबवणारी संस्था नसून ती एक बंधुभाव विकसित करून आपसी संवादातून समाजा प्रति आपुलकी निर्माण करण्यासाठी काम करणारी संघटना असल्याचे सांगून नूतन कार्यकारिणीस आपल्या शुभेच्छा दिल्या. संचालन नीरज देशमुख यांनी तर आभार प्रसाद राऊत यांनी मानलेत. यावेळी फर्स्ट लेडी संपदा जोशी, सोमेश्वर रत्नपारखी, प्रमोद तळोकर, अतुल चौधरी, डॉ. जुगल चिरानिया, ब्रिजमोहन चितलांगे, अकोला अर्बन बँकेचे अध्यक्ष शंतनुराव जोशी, आर्की राजेश राऊत, मनीषा राऊत, सुनील घोडके, प्रेरणा घोडके, ऐश्वर्या देशमुख, संजय कावळे, डॉ. श्रद्धा अग्रवाल, प्रेमकिशोर चांडक समवेत अनेक मान्यवर उपस्थित होते

## उर्दू टीचर्स असोसिएशनतर्फे मोहम्मद अफ्फानचा सत्कार

**लोकशाही वार्ता/चांदूर रेल्वे**

अमरावती येथे उर्दू टीचर्स असोसिएशन तर्फे विभागस्तरीय गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सभारंभ कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. यावेळी चांदूर रेल्वे येथील विद्यार्थी मोहम्मद अफ्फान शेख अब्दुल गफ्फार याचा सत्कार करण्यात आला.या प्रसंगी अमरावती जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रिया देशमुख, महानगर पालिकाचे माजी शिक्षणाधिकारी राजिक हुसैन व तसेच संघटनेचे विभागीय अध्यक्ष जहरोश गाजी व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



गुड मॉर्निंग

लोकशाही वार्ता

# अमरावती

नागपूर, शुक्रवार, ४ जुलै २०२५/ ११

## संगणकशास्त्र शिकण्याची विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी

**लोकशाही वार्ता/अमरावती**

आजच्या जगात संगणक साक्षरता अत्यंत महत्त्वाची आहे, त्याशिवाय माहिती मिळवण्यापासून तर विचारांची देवाणघेवाण आणि कामाचे व्यवस्थापन, डिजिटल अर्थव्यवस्थेत सहभागी होण्यापर्यंत विविध कामांसाठी संगणक आणि संबंधित तंत्रज्ञानाचा प्रभाविपणे वापर करण्यास ते सक्षम बनवते. केवळ सॉफ्टवेअर वापरण्याबाबतच नाही, तर तंत्रज्ञान कसे कार्य करते, वैयक्तिक आणि व्यावसायिक वाढीसाठी त्याचा कसा फायदा होतो, हे सर्व संगणक ज्ञानामुळे घडते. त्याचा विद्यार्थ्यांनी अवश्य लाभ घ्यावा.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

## दृष्टिक्षेप

### राष्ट्रीय सांख्यिकी दिन उत्साहात साजरा

**लोकशाही वार्ता/अमरावती**

प्रसिद्ध संख्याशास्त्रज्ञ प्रशांतचंद्र महालनोबीस यांचा जन्मदिवस २९ जून भारत सरकारव्दारे ह्यराष्ट्रीय सांख्यिकी दिनह्न म्हणुन घोषित करण्यात आलेला आहे. आर्थिक योजना आणि सांख्यिकी विकास या क्षेत्रातील प्रशांतचंद्र महालनोबिस यांच्या कायार्चा गौरव म्हणून देशात सर्वत्र २९ जून हा दिवस 'राष्ट्रीय सांख्यिकी दिन' साजरा करण्यात येतो. यानिमित्त सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय व उपायुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात राष्ट्रीय सांख्यिकी दिन साजरा करण्यात आला.यावेळी कार्यक्रमात प्रारंभी संख्याशास्त्रज्ञ प्रशांत चंद्र महालनोबीस यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. कार्यक्रमाला अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, अमरावतीच्या सहसंचालक संध्या गवई, सांख्यिकी उपसंचालक केतकी धरमारे, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे यांच्यासह विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच माजी अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

### रविनगर रस्त्यावरील होर्डिंग्ज मनपाने काढले

**लोकशाही वार्ता/अमरावती**

फ्लेक्स, बॅनर, होर्डींग वर मुद्रक व प्रकाशकाचे नाव टाकणे अनिवार्य आहे तसेच बाजार व परवाना विभाग, महानगरपालिका यांची परवानगी घेणे अनिवार्य आहे. अनधिकृत फ्लेक्स, बॅनर, होर्डींग असल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहे. शहरातील फ्लेक्स, बॅनर, होर्डींग काढण्याची धडक कारवाई करण्याचे स्पष्ट ताकीद देण्यात आली. होर्डींगची स्टॅबलीटी तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहे. जे होंर्डींग अनधिकृत ठरत असेल ते काढण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले होते. बाजार व परवाना विभागाच्या होर्डीगबाबत ज्या अटी आहे जे पुर्ण करतील त्यांना होंर्डींगचे नाहरकत प्रमाणपत्र देण्यात यावे. बाजार व परवाना विभाग व अतिक्रमण विभाग यांनी अनधिकृत फ्लेक्स, बॅनर, होर्डींग काढण्याचे कारवाई निरंतर सुरु ठेवावी अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. कोणीही अनधिकृत फ्लेक्स, बॅनर, होर्डींग शहरात लावू नये अन्यथा संबंधीतांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल.मनपा आयुक्त यांच्या आदेशानुसार आज दिनांक ३० जुन,२०२५ रोजी जेसीबीद्वारे रविनगर रस्त्यावरील अनधिकृत फलक हटविण्याची कार्यवाही करण्यात आली. त्या अनुषंगाने अमरावती महानगर पालिका अतिक्रमण विभागाने लगेचच तत्पर कार्यवाही सुरु करुन बाजार परवाना विभागाकडून परवानाधारक होर्डिंग्जची माहिती प्राप्त करुन घेत अनधिकृत होर्डींग हटविण्याच्या कार्यवाहीला तत्परतेने सुरुवात केली.कारवाई बाजार व परवाना विभागाचे कर्मचारी, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी यांनी केली.

# शाळेची दयनीय अवस्था; गटशिक्षणाधिकारी झाले स्तब्ध



**लोकशाही वार्ता/नांदगाव पेठ**

जिल्हा परिषद माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय येथे नुकतेच गटशिक्षणाधिकारी वानखडे यांनी भेट दिली. मात्र, शाळेची दयनीय अवस्था बघून गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख सुद्धा काही वेळ स्तब्ध झाले. वर्गखोल्यांची अवस्था ,मैदानाची दुर्दशा तसेच शिक्षणाचा झालेला बट्ट्याबोळ बघून थेट गटशिक्षणाधिकारी यांनाच शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

गटशिक्षणाधिकारी यांच्या दौऱ्यात सुद्धा प्राचार्य देवेंद्र ठाकरे हे रजेवर असल्याचे आढळुन आले तर पालकांनी शिक्षक आणि प्राचार्य यांच्या मनमानी कारभारावर संताप व्यक्त केला. माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार यांनी केलेल्या सुचनेनुसार गटशिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुख यांनी शाळेची संपूर्ण पाहणी केली यामध्ये शाळेला प्राप्त झालेल्या देखभाल व दुरुस्तीच्या निधीमध्ये मोठ्या आर्थिक अनियमितता असल्याच्या बाबी उघडकीस आल्या. वर्गखोल्यांची परिस्थिती, शौचालये, स्वच्छता, मैदान आदी बाबतीत दुर्दशा स्पष्टपणे दिसून आली. प्राचार्य देवेंद्र ठाकरे हे रजेवर असल्यामुळे शाळेच्या प्रशासनाची जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली जात नसल्याचे निर्दशनास आले. त्यामुळे शिक्षकांची अनुपस्थिती व वेळेचे भान नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत असल्याचे स्पष्ट झाले. शाळेतील सर्व शिक्षकांची पेशी घेऊन त्यांना शैक्षणिक कामाप्रति हयगय खपवून घेतल्या जाणार नाही असे गटशिक्षणाधिकारी वानखडे यांनी सुनावले तसेच झालेल्या चुकांबद्दल शिक्षकांनी माफीनामा लिहून देत यापुढे कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही असे आश्वस्त केले.गटशिक्षण अधिकारी व केंद्रप्रमुखांनी याबाबत गंभीर दखल घेतली असून संबंधितांची चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले यावेळी सरपंच कविता डांगे, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद डांगे, अभिजित बानासुरे, मनोज मोरे, अरुण राऊत आदी पालक वर्ग उपस्थित होते.

### प्राचार्य रजेवर, शिक्षकांनी दिले माफीनामे, शैक्षणिक अधोगतीला जबाबदार कोण?

शाळेच्या सर्वांगीण विकासाकरिता गावातील पालकांनी तसेच मान्यवरांनी शाळेला आर्थिक मदत केलेली आहे मी सुद्धा शालेय साहित्य करिता पाच हजार रुपयांची आर्थिक मदत केलेली आहे.मात्र ती मदत खरोखर विद्यार्थ्यांपर्यंत पोहचली की नाही हा संशोधनाचा विषय आहे.वरिष्ठांनी महाविद्यालयाचे विशेष लेखा परीक्षण करावे तसेच आर्थिक बाबींची चौकशी करावी अशी मागणी माजी जि. प.सदस्य नीतीन हटवार यांनी केली.

### स्थानिक पालकांमध्ये असंतोष

या सर्व घडामोडींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा परिणाम पाहता, पालक वर्गामध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शाळेच्या व्यवस्थापनात पारदशकता यावी, शिक्षकांनी नियमितपणे उपस्थित राहावे, निधीचा योग्य वापर व्हावा अशी मागणी जोर धरत आहे.

# ड्रग्स व अंमली पदार्थ विरोधी कडक धोरण अवलंबिले नाही तर अमरावती नशेच्या गर्तेत जाईल

### पावसाळी अधिवेशनात आ.संजय खोडके यांचा लक्षवेधीत वेधले लक्ष, केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरू - मुख्यमंत्री

**लोकशाही वार्ता/अमरावती**

राज्यात होत असलेल्या ड्रग्स व अंमली पदार्थाच्या विरोधात शासनाने कठोर धोरण अवलंबिले असून कारवायांबाबत प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र युनिट कार्यान्वित करण्यात आले असल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी राज्यविधि मंडळाच्या पावसाळी अधिवेशनातील चर्चेदरम्यान केली होती. याचे पडसाद गुरुवार दिनांक ०३ जुलै रोजी विधान परिषदेच्या सभागृहातही उमटले असता आ. संजय खोडके यांनी अमरावती शहरात ड्रग्स व अंमली पदार्थाची मोठ्या प्रमाणावर तस्करी होत असून यामध्ये मोठे रॅकेट सक्रिय असल्याचे सांगितले.

इतकेच नाहीतर अमरावतीसारख्या लहान शहरामध्ये मादक पदार्थांच्या तस्करीच्या केसेस वाढत असल्याने त्यांना पोलिस विभागाकडूनच वरदहस्त मिळत आहे का ? असा संशय व्यक्त करीत गृहविभागाने यावर कठोर पाऊले उचलून उपाययोजना करण्याची लक्षवेधी सूचना आ. संजय खोडके यांनी केली. अधिवेशनात बोलत असताना आ.संजय खोडके म्हणाले की, अमरावती शहरामध्ये एकाच वर्षात ड्रग्स व मादक पदार्थ तस्करीचे ३१ प्रकरणं समोर आली आहेत. आणि तेही जास्तीत जास्त प्रकरणं हे एकाच पोलिस स्टेशन अंतर्गत घडत आहे. म्हणजेच याचा अर्थ एकदा अंमली पदार्थांची विक्री करणारा माणूस कार्यवाही होऊन देखील पुन्हा पुन्हा तोच धंदा करत आहे. अमरावती शहर लहान आहे. त्यामुळे कुठे काय सुरू आहे व त्यात कोण सहभागी आहे , हेसुद्धा पोलिसांचे खुफिया व बिट जमादार यांना सर्वांना माहीत असताना याकडे डोळेझाकपणा व दुर्लक्ष केलं जात असल्याने अमरावती शहरात वाढत्या ड्रग्स व मादक पदार्थ तस्करीमध्ये पोलिसांकडूनच अभय दिला जात असल्याची सारशंका सुद्धा उपस्थित केली जात आहे. त्यामुळे हे असेच सुरू राहिले तर अमरावती शहर हे नशेचा गर्तेत गेल्या शिवाय राहणार नाही व नवी पिढी बर्बाद होईल, अशी चिंता आ. संजय खोडके यांनी सभागृहात लक्षवेधी मांडतांना व्यक्त केली.

तसेच यावर अंकुश लावण्यासाठी कडक धोरण अवलंबिण्यात यावे व अमरावती पोलीस आयुक्तांना याबाबतीत सूचना देण्यात यावी अशी मागणी सभागृ हासमक्ष केली. यावर उत्तर देतांना राज्याचे मुखमंत्री तथा गृहमंत्री देवेन्द्र फडणवीस म्हणले कि अमरावती शहरातील ड्रग्स व मादक पदार्थ तस्करीच्या वाढत्या प्रकरणात आपण स्वतः अमरावती पोलीस आयुक्तांशी चर्चा करून त्यांना या विरोधात कठोर धोरण अवलंबण्याचे निर्देशित करू. तसेच अल्पवयीनांचा सहभाग असल्यास त्यांच्या संबंध कुणाशी लागला त्यालाही दोषी धरून कार्यवाही करण्यात येईल असे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले. तसेच ड्रग्स व मादक पदाथार्बाबत एनडीपीएस अधिनियमांतर्गत कारवाई करतांना कमर्शियल क्वान्टिटी संदर्भातही केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे. ज्यामध्ये कारवाईतील ड्रग्सचे प्रमाण जे मोठे आहे ते कमी करता यावे , म्हणजेच छोट्या प्रमाणात ड्रग्स व मादक पदार्थ बाळगण्याला कमी प्रमाणात समजून ते विक्रीच्या संदर्भात बगळले असे गृहीत धरून शिक्षेस पात्र राहणार आहे. या दिशेने सुद्धा गृह खात्याचे प्रयत्न असल्याचे उत्तर नामदार देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

# धामणगाव तालुक्यात दोन सौरऊर्जा प्रकल्प झाले कार्यान्वित; आ. प्रताप अडसड यांच्या प्रयत्नांना यश

### मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना : अडीच हजार बळीराजांचे दिवसा सिंचनाचे स्वप्न पूर्णत्वास

**लोकशाही वार्ता/धामणगाव रेल्वे**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित व योग्य दाबाचा वीजपुरवठा करण्यासाठी महावितरण प्राधान्याने सौरऊर्जा प्रकल्पाची कामे पूर्णत्वाकडे जात आहेत. डिसेंबर २०२४ ते आजपर्यंत तालुक्यात दहा मेगावॉट निर्मिती क्षमतेचे एकूण दोन प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. या प्रकल्पांद्वारे तब्बल अडीच हजार शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा केला जात आहे. आ प्रताप अडसड यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

मुख्यमंत्री तथा ऊजार्मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना राबविण्यात येत आहे. याद्वारे राज्यातप्रकल्प मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करून राज्यात शेतीसाठी पूर्णपणे सौरऊर्जेवर निर्माण झालेल्या विजेचा पुरवठा करण्यात येणार आहे. या योजनेत महावितरणच्या वीज उपकेंद्राच्या ५ कि.मी. परिघातील जमिनीवर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत. यातून निर्माण होणारी वीज महावितरणच्या उपकेंद्रांतील फिडरद्वारे परिसरातील कृषिपंपांना दिवसा पुरवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत जलदगतीने सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत.सौर उर्जा प्रकल्पामुळे दिवसा वीज मिळणार असली तरी पाण्याचा उपसा मर्यादित ठेवण्याची गरज आहे. मागील काही वर्षांपासून दिवसा विजेची मागणी होती, ती आता आ प्रताप अडसड यांच्या प्रयत्नांमुळे पूर्णत्वाकडे जात आहे.मंगरूळ ,देवगाव परिसरातील शेतकऱ्यांना मिळतेय वीजसदरील जळगाव येथून मंगरूळ दस्तगीर उपकेंद्र तर उसळगव्हाण मधून देवगाव अश्या दोन उपकेंद्रांतून निघणाऱ्या कृषी वीज वाहिन्यांवरील अडीच हजार शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होत आहे. दिवसा वीजपुरवठा होत असल्यामुळे शाश्वत शेती करण्याचे शेतकऱ्यांचे स्वप्न मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे पूर्णत्वास आले आहे.

# माजी आमदाराने भाजपा पदाधिकाऱ्याला दिली जीवे मारण्याची धमकी!

### ठाणेदारांना शेकडो भाजपा पदाधिकाऱ्यांचे निवेदन

**लोकशाही वार्ता/वरूड**

वरूड मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आ.चंदू उर्फ उमेश यावलकर यांची रविवार २९ जूनला पत्रकार परिषद पार पडली. यावेळी भाजपाच्या काही पदाधिकाऱ्यानी आ.यावलकर यांच्यावर माजी आमदाराने केलेल्या आरोपाचे खंडण केले. याचा राग ठेवून भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष आणि तालुकाध्यक्ष यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी भ्रमणध्वनीवरून शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी भाजपा पदाधिकाऱ्यांनी १ जुलै रोजी पोलिस स्टेशन ला लेखी तक्रार दाखल केली आहे.यामुळे तालुक्याच्या राजकारणात महायुती मध्ये शीतयुद्ध सुरू झाले .

माजी आमदाराविरुद्ध अदखलपात्र गुन्ह्याची नोंद पोलिसांनी केली आहे.सदर तक्रारीत नमूद केल्या नुसार , पत्रकार परिषदेत आ .चंदू उर्फ उमेश यावलकर यांचे विरुद्ध केलेल्या आरोपांचे खंडण करून आपआपली भुमीका मांडली. त्याच दिवशी रात्री १० ते १२ वाजताच्या दरम्यान ३ वेळा भाजपा तालुकाध्यक्ष राजकुमार राऊत यांच्या भ्रमणध्वनीवर व्हॉट्सप व्हाईस कॉल आले, पण त्यांनी त्याला त्यावेळी प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर ३० जुन रोजी सकाळी साडेनऊ वाजता त्याच नंबरवरून राऊत यांना पुन्हा व्हॉट्सअॅप व्हाईस कॉल आला. त्यावेळी समोरील व्यक्तीने त्यांना म्हटले की, या नंतर माझ्याविरुध्द कुठेही बोलायचे नाही किंवा चर्चा करायची नाही, ही तुला लास्ट इंटिमेशन देतो, जर माझ्या विरोधात तू काही बोलला, तर तुला जिवंत ठेवणार नाही, तुझी लायकी नाही बोलायची,मी अनेक पक्षाचे कार्यकर्ते बरबाद केले, तुला पण बरबाद करुन टाकेल असे म्हणून शिवीगाळ केली व मला जीवे मारण्याची धमकी दिली. तर भाजपा जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर सोलव यांच्या तक्रारीत नमूद केले की, माझा भ्रमणध्वनीवर सुद्धा ३० जुन रोजी रात्रीच्या वेळी व्हॉट्सप व्हाईस कॉल आला त्याने म्हटले की, "तुम्ही माझ्याविरुद्ध बाईट दिली, मला शिविगाळ केली, आता तुमचे घराबाहेर निघणे मुश्किल करतो. असे म्हणून मला जीवे मारण्याची धमकी दिली. ज्या नंबरवरून राऊत आणि सोलव यांना कॉल आला तो भ्रमणध्वनी क्रमांक माजी आमदार देवेंद्र भुयार यांचा असल्याने अशा गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीवर अंकुश घालून त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून न्याय मिळावा, अशी मागणी ठाणेदार अर्जुन ठोसरे यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

विकास निधी रद्द करण्याचे मुद्द्यावरुन राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी भाजपचे विद्यमान आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांचे विकास निधी रद्द केल्याचे तसेच जातिवाद करीत असल्याचा आरोप पत्रकार परिषदेत केला होता.आरोपांचे खंडण करण्या करितां विद्यमान आ.यावलकर यांनी पत्रकार परिषद घेऊन आरोपांचे खंडण केले.तर भाजपा पदाधिकाऱ्यांनी माजी आमदार भुयार यांचा निषेध करून भावना व्यक्त केल्या.परंतु भुयार यांनी माजी जिल्हा उपाध्यक्ष सोलव,तालुकाध्यक्ष राऊत यांना व्हॉट्सअॅप वॉईस कॉलवरून धमक्या दिल्याने महायुतीत कलह माजला आहे.

# ऑटोचे नियंत्रण सुटल्याने ऑटो उलटली; १० प्रवासी जखमी

**लोकशाही वार्ता/दर्यापूर**

भरधाव ऑटो पलटी होऊन १० प्रवासी जखमी झाल्याची घटना बुधवारी तामसवाडी फाट्याजवळ घडली. या मध्ये जखमी झाले.

फुलवंती नंदू बडोदे (३८), कविता निलेश कोटवलकर (३०), अजयरावी नागोसे (२०), कोमल नंदू बडोदे (१५), प्रियांका रामू बडोदे (१८) सर्व रा. गोंडवाळी ता. अंजनगाव सुर्जी अशी अपघातात जखमी झालेल्यांची नावे आहेत.दर्यापूर ते अंजनगाव मार्गवरील तामसवाडी फाट्याजवळ बुधवारी रोजी दुपारी १ वाजता सुमारास ऑटो पलटी होऊन अपघात झाला. या अपघातात १० प्रवासी जखमी झाले. त्यातील ३ जण गंभीर असून त्यांना दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सर्वजण शाळेच्या कामानिमित्त ऑटोने जात होते. ऑटोचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. गंभीर जखमींना अमरावती येथील सामान्य रुग्णालयात रवाना करण्यात आले आहे. पुढील तपास ठाणेदार व कर्मचारी करीत आहे.

# मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी केली ईटीसी केंद्र, दवाखाने व शाळेची पाहणी

**लोकशाही वार्ता/अमरावती**

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी बुधवार, २ जुलै २०२५ रोजी ईटीसी सेवा व सुविधा केंद्र (भौतिक उपचार केंद्र), आयसोलेशन दवाखाना, अंबिका नगर दवाखाना आणि मनपाच्या शाळेला अचानक भेट देत तपासणी केली.ईटीसी केंद्राच्या पाहणीत आयुक्तांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सर्व सुविधा तत्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. केंद्रातील रिक्त पदे लवकरात लवकर भरावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. संबंधित अधिकाऱ्यांनी या महत्त्वाच्या उपक्रमासाठी सजग राहावे, आणि केंद्र सर्व सुविधा युक्त असावे यासाठी प्रयत्नशील राहावे, असे निर्देश देत निधी मनपा आणि शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.आयुक्तांनी अंबिका नगर व आयसोलेशन दवाखान्याच्या नियोजनाचीही पाहणी केली. यावेळी स्वच्छता, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, उपलब्ध औषधे, रुग्णांसाठी असलेल्या सुविधा, इमारतीचे स्वरूप आदी बाबींवर सखोल चर्चा झाली. दवाखाने चोख व कार्यक्षम राहण्यासाठी आरोग्य सेवांमध्ये कोणतीही तडजोड होऊ नये, यावर भर देत आयुक्तांनी स्पष्ट सूचना दिल्या.

### प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी ३१ जुलै मुदतवाढ

**लोकशाही वार्ता/अमरावती**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २५-२६ साठी जिल्ह्यातील शेतकरी सहभागास सुरुवात झाली आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगांसारख्या प्रतिकूल परिस्थिती मुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण प्रदान करणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. विमा काढण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २५ आहे.

# शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नी आयुक्तांच्या दालनात खल; तत्काळ समस्या मार्गी लावण्याचे आदेश!

### विभागातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांची उपस्थिती, प्रहार शिक्षक संघटनेच्या आंदोलनाला मोठे यश

**लोकशाही वार्ता/अमरावती**

प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांबाबत विभागीय आयुक्तांच्या दालनात खल करण्यात आला.शिक्षकांच्या प्रलंबित समस्या तत्काळ मार्गी लावण्याचे आदेश याप्रसंगी विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले.तसेच याबाबत संघटनेच्या स्वतंत्र बैठका घेण्याचे निर्देश सुद्धा अधिकाऱ्यांना देण्यात आले.

३ जुलै २०२५ रोजी प्रहार शिक्षक संघटनेची विभागीय बैठक आयुक्तालयात आयोजित करण्यात आली होती. विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांचे अध्यक्षतेखाली शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांवर चर्चा करण्यात आली.समस्या तत्काळ मार्गी लावण्याचे आदेश विभागीय आयुक्तांनी याप्रसंगी विभागातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले. संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी विभागातील शिक्षकांचे प्रलंबित



प्रश्न यावेळी बैठकी प्रसंगी मांडले.यात ग्रामीण शिक्षण व्यवस्था मोडीत काढणारा व शिक्षण हक्क कायद्याची पायमल्ली करणारा संच मान्यता दिनांक १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात यावा या प्रमुख मागणीसह इतर प्रमुख मागण्यांवर चर्चा करण्यात आली.बैठकीला पाचही जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी , शिक्षण उपसंचालक व विभाग प्रमुख यांचेसह प्रहार शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष महेश ठाकरे ,विभागीय सचिव अमोल आगे ,राज्य प्रवक्ते कुलदीप डंभारे,अकोला अध्यक्ष मंगेश टिकार जिल्हा कार्याध्यक्ष अमर भागवत ,सचिव प्रमोद करणकार ,अमरावती जिल्हाध्यक्ष शरद काळे, सचिव अमोल व-हेकर ,यवतमाळ जिल्हाध्यक्ष अमोल गोपाळसुधीर भुस्कुटे,संदीप बरडे, बुलढाणा जिल्हाध्यक्ष महेंद्र रोठे सचिव देवीदास बडगे, वाशीम जिल्हाध्यक्ष महादेव ठाकरे आर्दीसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते.

# माधान येथे श्री संत गुलाबराव महाराज जन्मोत्सव

### ५ ते ७ जुलैपर्यंत तीन दिवसीय सोहळा



**लोकशाही वार्ता/चांदूरबाजार**

श्री संत गुलाबराव महाराज यांचे पित्रुक गांवतालुक्यातील माधान येथे , श्री महाराजांच्या १४४ व्या जन्म दिनानिमित्त तीन दिवसीय अध्यामिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ५ ते ७ जुलै पर्यंत होणाऱ्या या सोहळ्याच्या पहिल्या दिवशी, ५ जुलैला सकाळी ७ वाजता श्री महारांचा अभिषेक संपन्न होणार आहे.याच दिवशी सकाळी ८ वाजता पारायण सेवा संपन्न होईल.त्यानंतर १०.३० ला माजी आमदार बच्चू कडू यांच्या उपस्थितीत,नविन वास्तुचे पुजन व श्री महाराजांच्या भक्तांचा स्नेह मिलन सोहळा संपन्न होईल. दुसऱ्या दिवशी ६ जुलैला सकाळी ७ वाजताश्री क्षेत्र माधान ते श्री क्षेत्र देऊरवाडा पायदळ दिंडी यात्रा होईल.श्री महारांजांनी देऊरवाडा येथे पूर्णा नदीच्या तीरावर,गोपी भावाने भगवान श्रीकृष्णांच्याप्राप्ती करीता कात्तायनी व्रत केले होते.त्याचे औचित्य साधून ही दिंडी यात्रा काढण्यात येते.याच दिवसी दुपारी ४ वाजता पारायण होईल.तसेच रात्री आठ वाजता, ह.भ.प. राजेश्वर महाराज इंगळे यांचे हरि किर्तन संपन्न होईल. तसेच तीसर्या दिवसी ७ जुलैला सकाळी ७ वाजता पारायण सेवा संपन्न होईल.त्यानंतर सकाळी ९ वाजता आमदार प्रविण तायडे यांचे उपस्थित सांगता सोहळा व काल्याचे किर्तन होईल.त्यानंतर दुपारी १ वाजता महाप्रसादाने सोहळ्याची समाप्ती होईल.या जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन, श्री संत गुलाबराव महाराज संस्थान माधान यांनी केले आहे.तरी या जन्मोत्सव सोहळ्याचा आनंद अनुभवण्यासाठी परिसरारातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

लोकशाही वार्ता
यवतमाळ
गुड मॉर्निंग
नागपूर, शुक्रवार, ४ जुलै २०२५/ १२

## आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक

**लोकशाही वार्ता/कळंब :** बांधकाम कामगार यांचे ९० दिवसाचे प्रमाणपत्र देतो असे म्हणून नागरिकांकडून अवाजवी पैसे घेऊन नागरिकांची व शासनाची दिशाभूल करून फसवणूक केली. याप्रकरणी राजेश केशवराव वनारे (६५) यांनी नागरिकांना बांधकाम कामगारांचे प्रमाणपत्र देतो असे म्हणून आर्थिक फायद्या करून घेऊन शासनाची व नागरीकांची फसवणुक केली. याप्रकरणी राजेश केशवराव वनारे यांच्या तक्रारीवरून प्रज्वल शीरसकर विरुद्ध गुन्हा नोंद केला.

## किराणा दुकान फोडले

**लोकशाही वार्ता/आर्णी :** किराणा दुकानात घरफोडी केल्याची घटना घडली. याप्रकरणी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या किराणा दुकानाच्या शटरचे कुलूप कोंडा तोडुन आत प्रवेश करून दुकानातील २९,००० रुपये तसेच मुनीर चव्हाण यांचे दुकानाच्या गल्ल्यातील ८ हजार रुपये असे म्हणून ३७००० रुपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने लंपास केला. याप्रकरणी विठ्ठल किसन राऊत रा. महालक्ष्मीनगर यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद केला.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

# हायमास्ट लाईट कामात १.७८ कोटींचा गैरव्यवहार

## यवतमाळ नगर परिषदेतील भ्रष्टाचार चव्हाट्यावर; आमदारांनी विधानसभेत वेधले लक्ष; अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

यवतमाळ नगर परिषदेच्या कारभारात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी केला आहे. शहरातील हायमास्ट आणि एलईडी लाईटच्या कामात मोठा गैरव्यवहार झाल्याचे सांगत, त्यांनी हा प्रश्न विधानसभेच्या प्रश्नोत्तर तासात उपस्थित केला आणि सखोल चौकशीची जोरदार मागणी केली.

आमदार मांगूळकर यांनी विधानसभेत माहिती देताना सांगितले की, यवतमाळ शहरात हायमास्ट आणि एलईडी लाईटच्या कामासाठी काढण्यात आलेली ३ कोटी १४ लाख रुपयांची निविदा, अनेक पात्र पुरवठादारांना डावलून कामाचा अनुभव नसलेल्या फर्मला देण्यात आली. या कामात शहर अभियंता आणि संबंधित ठेकेदार यांनी संगनमत करून तब्बल १ कोटी ७८ लाख ९० हजार रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, असा थेट आरोप त्यांनी केला. विशेषतः, ४० सोलर हायमास्टच्या कामात हा भ्रष्टाचार झाल्याचे त्यांनी नमूद केले. ही निविदा निश्चित करण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तांत्रिक अधिकाऱ्यांची मंजुरीही घेण्यात आली नाही आणि अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले, असेही ते म्हणाले. याशिवाय, नगर परिषद क्षेत्रातील दलित वस्ती आणि अल्पसंख्याक भागातील विकास कामांमध्येही मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली आहे. तसेच, अनेक सफाई कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीकडे (ईपीएफ) दुर्लक्ष करून आणि त्यांना किमान वेतनापेक्षा कमी मजुरी देऊन त्यांचे आर्थिक शोषण केले जात असल्याचा आरोपही मांगूळकर यांनी केला. त्यामुळे या सर्व प्रकरणांची तातडीने सखोल चौकशी करून, संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.




# अयोध्या पौळविरुद्ध शिवसेना महिला आघाडीची पोलिस तक्रार

**लोकशाही वार्ता/ दारव्हा**

दारव्हा-मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या बद्दल एका महिलेने ऑडिओ क्लिप व्हायरल केल्याने शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या भावना दुखावल्या; त्यामुळे संबंधित महिलेवर तात्काळ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी आज शिवसेना महिला आघाडीच्या वतीने दारव्हा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.



शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या कार्यकर्ते अयोध्या पोळ यांनी एका कार्यकर्त्यांसोबत फोनवर बोलताना मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या विरोधात एक ऑडिओ क्लिप केली आहे . या व्हायरल क्लिप मुळे मंत्री राठोड यांचा अपमान होत आहे. त्यामुळे संबंधित महिलेच्या अशा वक्तव्यामुळे शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या असून कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा प्रकार थांबविण्याकरिता अयोध्या पोळ यांच्यावर गंभीर स्वरूपाची गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी यावेळी दारव्हा पोलिस स्टेशनच्या पोलिस निरीक्षकाकडे निवेदनातून केली आहे . यावेळी जिल्हाप्रमुख यशवंत पवार ,तालुका प्रमुख मनोज सिंगी, शहर प्रमुख राजू दुधे, महीला आघाडी तालुका प्रमुख पुष्पा ससाने, महिला आघाडी शहर प्रमुख आशाताई डोंगरे, सुरेखा राठोड, मंगला निंबेकर,रुजाता राऊत ,चंद्रदिपा चव्हाण , शितल राठोड, शोभाताई राठोड , अश्विनी कुरसिंगे,जया लाभसेटवार ,वैशाली खाटीक , जयश्री दुधे, दीपा सिंगी , शांता जाधव, पुष्पा बेलपत्रे, मीराबाई टेकाम, गणेश दुबे, विनोद वांडरस्वार, प्रकाश दुधे, मुकुंद चिरडे, रोहिदास पवार, दीपक जाधव, विवेक जाधव, योगेश गवळी, विनोद आडे,धिरज मनवर,व इतर शिवसैनिक उपस्थित होते.

## दृष्टिक्षेप

### मुलगा पोलिस खात्यात, परिवारात आनंद



**ढाणकी :** येथील प्रतिकूल, सामान्य शेतकरी कुटुंबातील विशाल विलास गडदे ह्याने स्वकर्तुत्वाने, अभ्यासाच्या बळावर आपल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत यश मिळविले असून, तो एस आर पी एफ मध्ये पोलिस शिपाई पदावर नागपूर येथे नुकताच नियुक्त झाला आहे. याबद्दल त्यावर समस्त ढाणकीवासीयाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्याच्या यशाचे श्रेय तो आपल्या आई वडील व हितचिंतकांना देतो.

### बांधकामाचे टोपले घेण्यावरून वाद

**लोकशाही वार्ता/पुसद**

बांधकामाचे टोपले घेण्यावरून वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी फियार्दीसोबत बांधकामाचे टोपले घेण्याच्या कारणावरून वाद करून शिविगाळ केली व लाथाबुक्याने तसेच विटेने डोक्यावर मारून जखमी केले. ही घटना २५ जुन रोजी घडली. याप्रकरणी बबीता प्रदीप जाधव यांच्या तक्रारीवरून चंदन विलास राठोड, विलास राठोड व अधिक एका विरूध्द गुन्हा नोंद केला.

### फर्निचरच्या दुकानात चोरी

**वणी :** येथील फर्निचरच्या दुकानात चोरी केल्याची घटना घडली. याप्रकरणी अज्ञात चोरट्याने फियार्दीच्या वेल्डींग दुकानातील वेल्डींग मशीन, इलेक्ट्रीक बोर्ड, ग्राईडर, स्क्रु फिटींग मशिन असे एकूण १८,५०० रुपयाचे साहित्य चोरून नेले. याप्रकरणी अनिकेत गजानन गहुकर यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद केला.

# देऊरवाडी (लाड) येथे जुन्या वादातून युवकाचा खून

## अल्पवयीन संशयित ताब्यात

**लोकशाही वार्ता/दारव्हा**

देऊरवाडी लाड येथे जुन्या वादातून एका युवकाचा धारदार शस्त्राने गळ्यावर वार करत खून करण्यात आला. ही घटना मंगळवारी, १ जुलै रोजी रात्री घडली असून, लाडखेड पोलिसांनी या प्रकरणी एका विधिसंघर्षग्रस्त अल्पवयीन बालकाला ताब्यात घेतले आहे.

मृत युवकाचे नाव रोहन दीपक चामलाटे (१७, रा. देऊरवाडी) असे आहे. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, संशयित अल्पवयीन मुलाने जुन्या वादातून रोहनच्या गळ्यावर धारदार चाकूने तीन ते चार वार केले. या गंभीर हल्ल्यात रोहण याला प्रचंड रक्तस्त्राव झाला. उपचारासाठी रुग्णालयात नेत असताना त्याचा रस्त्यातच मृत्यू झाला. घटनेनंतर अल्पवयीन बालक घटनास्थळावरून पसार झाला होता. मात्र, पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून दारव्हा रोडवर त्याला अटक केली. या प्रकरणी मृताच्या आई रेखा दीपक चामलाटे यांनी लाडखेड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेचा सखोल तपास ठाणेदार विनायक लंबे, पीएसआय जायभाये, सहायक फौजदार प्रकाश रत्ने व उमेश शर्मा करीत आहेत. दरम्यान, गुन्हेगारी घटनांमध्ये अल्पवयीन मुलांचा वाढता सहभाग हा समाजासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. मागील काही महिन्यांत जिल्ह्यात खून व प्राणघातक हल्ल्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, त्यातील अनेक प्रकरणांमध्ये अल्पवयीनांची गुंतवणूक दिसून येत आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# दुचाकी चोरणारे दोघे जेरबंद

## आठ चोरीच्या मोटारसायकली जप्त, ४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**लोकशाह वार्ता/यवतमाळ**

शहर आणि जिल्ह्यातील वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांना आळा घालण्यात स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश आले आहे. पोलिसांनी दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये दोन सराईत आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून एकूण आठ चोरीच्या मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. या जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ४ लाख २० हजार रुपये आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करत असताना, त्यांना शेख सोहेल शेख मेहबूब (वय २७, रा. मेमन कॉलनी, यवतमाळ) हा चोरीची गाडी विकण्याच्या उद्देशाने फिरत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, त्याने इतरही अनेक गाड्या चोरल्याचे कबूल केले. त्याच्याकडून पोलिसांनी एकूण सहा मोटारसायकली जप्त केल्या. त्याचा संबंध अवधूतवाडी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्याशी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

दुसऱ्या कारवाईत, अमरावती येथील गुन्हेगार फारूख खान ऊर्फ शाहरूख शमशेर खान (वय ३२) हा यवतमाळात सासुरवाडीला आला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याच्याकडे चोरीची पल्सर मोटारसायकल असल्याची माहिती मिळाल्यानंतर, त्यालाही ताब्यात घेण्यात आले. त्याने वडगाव ग्रामपंचायत परिसरातून मार्च महिन्यात ही गाडी चोरल्याचे कबूल केले. तसेच, पाच-सहा महिन्यांपूर्वी नेर येथून चोरलेली एक स्प्लेंडर गाडीही त्याच्याकडून जप्त करण्यात आली. ही यशस्वी कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक पियुष जगताप आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईच्या पथकात पोलीस उपनिरीक्षक गजानन राजमल्लू, सै. साजिद, रुपेश पाली, योगेश डगवार, प्रशांत हेडाऊ, कविश पाळेकर, सुनील पैठणे, आकाश सूर्यवंशी, देवेंद्र होले, सोहेल मिर्झा आणि दिगांबर पिलावन यांचा समावेश होता.

# मोफत बियाण्यांच्या यादीकडे शेतकऱ्यांचे लक्ष

**लोकशाही वार्ता/ढाणकी**

महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांना मदतीसाठी १०० टक्के मोफत बियाणे योजना आणली आहे. या योजनेत शेतकऱ्यांना चांगल्या आणि प्रमाणित बियाण्यांची पिशवी १०० टक्के मोफत मिळणार आहे. म्हणजे बियाण्यांसाठी पैसे द्यावे लागणार नाहीत. या योजनेत सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, भात अशा पिकांच्या बियाण्यांचा समावेश आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख २९ मे होती.

महाडीबीटी पोर्टलवर तांत्रिक अडचणी आल्यामुळे शेतकऱ्यांना अर्ज करता येत नव्हता. म्हणून सरकारने ही तारीख ३१ मे केली. पण अडचणी अजूनही होत्या, म्हणून आता ही तारीख वाढवून दिली वेबसाइट हळू चालत होती. अर्ज करताना पेमेंट होत नव्हते,फार्मर आयडी ओळखले जात नव्हते या सगळ्या अडचणींमुळे शेतकऱ्यांना त्रास झाला. म्हणून सरकारने शेतकऱ्यांना अजून थोडा वेळ दिला आहे. शेतकऱ्यांनी आपल्याला सरकारी योजनेचा फायदा मिळाला पाहिजे म्हणून आपले शेतीचे कामे बुडवून ऑनलाईन सेंटर गाठून शासनाकडे आपल्याला मोफत बियाणे मिळाले पाहिजे म्हणून अर्ज केला. ज्यांचा प्रथम अर्ज आला त्याप्रमाणे लाभ मिळणार असे धोरण आवलबल्याने नोंदणी झालेल्या शेतकऱ्याला प्रत्येकी दोन बॅग म्हणजे ४४ किलो बियाणे मोफत मिळाले.

अनेक शेतकऱ्यांनी शासना कडे नोंदणी करूनही अध्याप मोफत बियाणे मिळाले नाही. बियाण्याची यादी लागली का पाहण्यासाठी शेतकरी ऑनलाईन केलेल्या कॉम्पुटर सेंटर च्या चकरा मारत आहे.

पेरणीचे दिवस असल्याने शेतकरी शासन मोफत बियाण्यांची यादी कधी प्रसिद्ध करते याकडे डोळे लावून आहे. ऑनलाईन करूनही बियाणे येत नसल्याने काही शेतकऱ्यांनी स्वखर्चाने बियाणे घेऊन शेतात पेरणी केली. शासनाच्या बियाण्याची वाट पाहिली तर शेती पडीक ठेवण्याची वेळ शेतकऱ्यावर आली असती. असे शेतकरी बोलून दाखवत आहेत.

पेरणीचे दिवस आटोपल्या नंतर शासनाचे बियाणे मिळणार का? शासनाकडून मिळणाऱ्या बियाण्याची वाट पाहत बसणाऱ्या शेतकऱ्याला आपली शेती निश्चित पडीक ठेवावी लागणार.शासनाने लवकर यादी प्रसिद्ध करून बियाण्याचा लाभ देण्याची मागणी शेतकरी करत आहे.

# कलगाव सोसायटीचे सचिव डाखोरे अखेर निलंबित

## मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा देखरेख समिती संस्थेचा आदेश

**लोकशाही वार्ता/दिग्रस**

तालुक्यातील कलगाव येथील विविध कार्यकारी सोसायटीचे सचिव एल डब्ल्यू डाखोरे हे अनेकदा कुठल्या ना कुठल्या कारणाने नेहमीच चर्चेत राहिले असताना पुन्हा एकदा कामकाजात अक्षम्य दिरंगाई केल्यामुळे व सचिवाची जबाबदारी योग्यरीत्या पार पाडलेली नसल्यामुळे त्यांना निलंबन केल्याचे कार्यालय मुख्य कार्यकारी अधिकारी यवतमाळ जिल्हा देखरेख सहकारी संस्था यवतमाळ आदेशात नमूद केले आहे.

५ मे २०२५ चे पत्रानुसार बँकेकडून कलगाव संस्थेची तपासणी केली असता कलगाव संस्थेच्या कर्जदार सभासदांनी कर्ज वसुलीची भरणा केलेली रक्कम बँकेत भरणा न करता संस्थेच्या कर्जदार सभासदांना लेजरमध्ये रक्कम प्राप्त झाल्याचे नोंदविले.

संस्थेच्या कॅशबुकमध्ये कर्जाच्या वसुलीची रक्कम काल्पनिकरित्या नोंदविली व नवीन के. सी. सी कर्ज मंजुरी करिता संस्थेद्वारे ६१३१०७ चा कर्ज वाटप तक्ता शाखा निरीक्षक यांच्याकडे सादर करून कर्ज वाटप केले. व इतरांना एकदा कर्ज वाटप झाले असताना पुनश्च कर्ज वाटप करण्याकरता तक्ता सादर केला.

दोनदा कर्ज मंजूर करून खातेदाराच्या केसीसी लोन खात्यातील रोख रक्कम संस्थेचे सहाय्यक कर्मचारी पखाले यांना प्राप्त झाल्याचे व त्यांच्याकडून वसुली असल्याचे निदर्शनास आल्यामुळे कामकाजात अक्षम्य दिरंगाई करून सचिवाची जबाबदारी योग्यरीत्या पार पडलेली नसल्यामुळे निलंबन करीत असल्याचे पत्र प्राप्त झाल्यामुळे खळबळ उडाली आहे. मागील काही वर्षांपूर्वी या सचिवाने कर्ज वाटपादरम्यान बराच काही सावळा गोंधळ केल्यामुळे त्याचीही चौकशी अजूनच सुरू असल्याचे कळते.

# वाई (ढोकी) गाव पायाभूत सुविधेपासून वंचित

**लोकशाही वार्ता/पांढरकवडा**

तालुक्यातील आडवळणावर असलेले (वाई) ढोकी गाव स्वातंत्र्यकाळापासून पायभूत सुविधेपासून वंचित असल्याने ढोकी येथील नागरीक वीज, पाणी, स्वच्छता व रस्त्याच्या समस्येचा सामना करित दिवस काढत असल्याचे वास्तव समोर आले आहे. (वाई) ढोकी येथील नागरीकांचा केवळ मतदानासाठी वापर करून, लोकप्रतिनिधींचे कायम दुर्लक्ष असल्याने दिसून येत आहे. नागरीकांना पायाभूत सुविधा पोहचत नसल्याची ओरड ढोकी येथील नागरिकांची आहे. त्या समस्येला वाचा फोडण्यासाठी ग्राम संघर्ष समितीच्या वतीने पायाभूत सुविधा मिळावी यासाठी समितीचे अध्यक्ष अशोक चौधरी यांच्या



नेतृत्वात तालुक्याचे उपविभागिय अधिकारी यांना निवेदन सादर करून पायाभूत सुविधा द्यावी असी मागणी केली आहे .

राजकिय पुढारी केवळ फुकटच्या मिळाणाऱ्या मतदाराकडून मताचा वापर करून केवळ पोकळ आश्वासनांची वल्गना करणारे सत्तेत असलेले लोकप्रतिनिधी स्वःताचा विचार करून "दुनिया जाये भाड मे " हे सुत्र अवलंबित सत्तेचे फळे चाखतात मात्र ढोकी गावातील नागरीकांना काय हवे याचा कुठलाही विचार न करणारे लोकप्रतिनिधी जनतेला वाऱ्यावर सोडतात, ढोकी येथे पोहचण्यासाठी धड रस्त्याची व्यवस्था अनेक वषार्पासून नाही. माळ पठारावरून वाट काढीत चिखल तुडवत जाणे हेच नशिबी असून विज समस्या , पाणी समस्या , आरोग्य सोईची वानवा यामुळे या गावातील नागरीकांनी ग्राम संघर्ष समितीच्या माध्यमातून प्रशासनाला गावातील समस्येची यादी देत निवेदन सादर केले. प्रशासनाने व लोकप्रतिनिधीने यावर लक्ष देऊन गावात पायाभूत सुविधा पुरवावी अशी मागणी केली आहे. यावर त्वरित तोडगा न काढल्यास संपूर्ण ढोकी येथील रहीवाशी लोकशाही मार्गाने तिव्र आंदोलन करणार असल्याचे ढोकी ग्राम संघर्ष सनीचे अध्यक्ष अशोक चौधरी यांनी सांगीतले. यावेळी विक्रमसिंग डोंगरे,संदिप राजुरकर,नितिन येडमे, मंगल राऊत,जग्गु काळे, यादव आस्वले, विशाल बोंडे, अतुल बोंडे,यादव आस्वले, विष्णु कोयचाडे, गोवर्धन मेश्राम,जैन आत्राम, सुधाकर डाहाके ,प्रदीप वाढई, तसेच संपुर्ण ग्रामवीसी मोठ्या संख्येंने उपस्थित होते.

# एसीएफने आदेश करूनही माहिती देण्यास टाळाटाळ

## राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल

**लोकशाही वार्ता/दिग्रस**

पुसद वनपरिक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या पुसद व काळी विभागात वन्य प्राण्यांने पशुधनावर केलेल्या हल्ल्यामुळे झालेल्या नुकसानीची संबंधित व्यक्तीस भरपाई देण्यात आली त्याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नुकसानग्रस्त व्यक्तीच्या नावाची यादी व इतर माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी पुसद, काळी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्यामुळे सहाय्यक वनसंरक्षक पुसद यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले असता तेथेही जन माहिती अधिकारी गैरहजर झाल्यामुळे सात दिवसात माहिती पुरवण्याचा केलेला आदेश झुगारून माहिती न दिल्यामुळे राज्य माहिती आयोग अमरावती यांच्याकडे संबंधित व्यक्तीने अपील दाखल केले आहे. माहिती न देण्यामागे बराच काही भ्रष्टाचार दडलेला असल्याची चर्चा होत आहे.

# त्या चिखलमय रस्त्याची दुरुस्ती करून गतिरोधक बसवा

## आझाद समाज पक्षाची मागणी

**लोकशाही वार्ता/ढाणकी**

येथील स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे चौक ते संविधान चौक या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात रहदारी आहे , या रस्त्यात चिखल साचल्यामुळे घसरगुंडी तयार झाली आहे रस्त्याच्या दोन्ही कडेने नालीचे बांधकाम झाल्यामुळे रस्त्याच्या कडेची माती रस्त्यावर येऊन मोठा चिखल साचला आहे, या रस्त्यावरून जाताना अनेक दुचाकी स्लिप होऊन अपघाताच्या घटना घडत आहेत.

याच रस्त्याने शेकडे विद्यार्थिनी ये-जा करतात. याच रस्त्यालगत असलेल्या स्वामी पेंडसे गुरुजी, एम सी सी इंग्लिश मीडियम स्कूल, स्वर्गीय गुलाब सिंह ठाकुर प्राथमिक



शाळा , जुने बस स्टँड चौक नवीन बस स्टँड चौक, या ठिकाणी रस्त्यावर गतिरोधक बसवणे अत्यंत गरजेचे असून सदर रस्त्यावर गतिरोधक नसल्यामुळे अनेक वेळा भरधाव वाहनामुळे अपघात होऊन जीवित हानी सुद्धा झाली आहे, या रस्त्याने शाळेत जाण्याकरिता पैदल, सायकलने, दुचाकीने ढाणकी सह जवळपास ५० खेड्यापाड्यातील विद्यार्थी विद्यार्थिनी ये जा करीत असतात , सदर चिखल साचलेल्या रस्त्याचे दुरुस्ती करून त्यावर तातडीने गतिरोधक बसविण्यात यावे अन्यथा आजाद समाज पक्षाच्या वतीने याच रस्त्यावर बसून चक्काजाम आंदोलन करण्यात येईल असा इशारा सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता यांना निवेदनाद्वारे देण्यात आले यावेळी, जिल्हाध्यक्ष प्रशांत उर्फ जॉन्टी विणकरे, जिल्हा महासचिव संतोष जोगदंडे, तालुकाध्यक्ष देवानंद पाईकराव, ढाणकी शहराध्यक्ष, गोलू मुनेश्वर, समाधान राऊत, आबा गायकवाड, सचिन वाहुळे, राहुल धुळधुळे, आत्माराम आडे, आशिष खडसे उपस्थित होते.

# इंदिरानगर जिल्हा परिषद शाळेमध्ये शालेय साहित्याचे वाटप

**लोकशाही वार्ता/महागांव**

सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप सोसायटी लि. गोंदिया शाखा. महागाव सहयोग च्या उडान ग्रुप मार्फत जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा इंदिरा नगर महागाव येथे सर्व गरजू विध्यार्थी यांना



स्कुल बॅगचे वाटप करण्यात आला महागाव शाखेचे अइट मनोज सुकळकर शाखेचे कर्मचारी व उत्कृष्ट ग्राहक जयश्री नरवाडे, शीतल कावळे शिक्षिका शारदा दामधार संजय नरवाडे, सुनील कोळपे ,चित्तरांज सिनकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला सर्व गरजू विध्यार्थी यांना शिक्षणात कोणतीही कमतरता भासू नये व त्यांची शिक्षणाची आर्थिक बाजू बळकट करण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.